cmyk

## संपादकीय

### घोडा मैदान टप्प्यात आले...!

महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाला आता रंग चढू लागला आहे. निवडणूक मैदान आता सजू लागले आहे. महायुतीचा घटक पक्ष भारतीय जनता पक्षाने आपली ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करुन आघाडी घेतली आहे. महायुतीचा दुसरा घटक पक्ष राष्ट्रवादी अजितदादा पवार गटाने थेट एबी फॉर्म देत ३८ जणांना उमेदवारी तिकीट देऊ केले आहे तर तिसरा घटक पक्ष शिवसेना एकनाथ शिंदे गट यांनी आपली ४५ जणांची यादी जाहीर केली. यादीवर घराणेशाहीचा छाप आहेच. दरम्यान महाआघाडीकडून शरद पवार यांची उमेदवारांची यादी गुरूवारी जाहीर करण्यात आली.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### संजीव खन्ना बनले सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश

नवी दिल्ली : सुप्रीम कोर्टाचे न्यायमूर्ती संजीव खन्ना यांची भारताचे नवे सरन्यायाधिश म्हणून गुरूवारी नियुक्ती झाली. केंद्र सरकारने त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले असून त्यांच्या नियुक्तीचे नोटिफिकेशन काढण्यात आले आहे. मावळते सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड यांनी न्या. खन्ना यांच्या नावाची शिफारस सरकारकडे केली होती. येत्या १० नोव्हेंबर २०२४ रोजी चंद्रचूड यांचा कार्यकाळ संपणार आहे, त्यानंतर ११ नोव्हेंबर २०२४ पासून न्या. खन्ना सरन्यायाधिशपदाची सूत्रे स्वीकारतील.

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–१८३ शुक्रवार, दि.२५ ऑक्टोबर २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

# हक्काच्या पैशासाठी आज ऊस परिषद

## राज्यभरातील शेतकऱ्यांची राहणार उपस्थिती



कोल्हापूर । प्रतिनिधी

गतवर्षीच्या उसाचे अंतिम बिल प्रतिटन दोनशे रुपये तसेच या वर्षी तुटणाऱ्या उसाला एफआरपी (रास्त आणि किफायतशीर दर) पेक्षा किती जादा दर निश्चित करावा यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेची २३ वी ऊस परिषद शुक्रवारी (दि. २५) दुपारी तीन वाजता जयसिंगपूर येथील विक्रमसिंह मैदानावर होत आहे. यासाठी राज्यभरातील शेतकरी उपस्थित राहणार आहेत.

परिषदेच्या तयारीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष, माजी खासदार राजू शेट्टी यांच्यासह ◀◀ पान २ वर

### सावकार मादनाईकही उपस्थित राहणार

गेल्या काही दिवसांपासून राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेतील भूमिकेवरून नाराजी पसरल्याची चर्चा आहे. त्यामुळेच सावकार मादनाईक हे स्वाभिमानी शेतकरी संघटनेला सोडचिट्टी देणार असल्याची चर्चा आहे. त्यांना शिंदे गटाकडून निमंत्रण देण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळामध्ये रंगली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर बोलताना शेट्टी यांनी खुलासा केला. ते म्हणाले की, सावकार मादनाईक यांच्याबाबत काही जणांना वाटते. मात्र, तसे काही सुद्धा होणार नाही. ऊस परिषदेला ते उपस्थित असतील. त्यांची काही अडचण नसल्याचे शेट्टी म्हणाले.

### आमचे उमेदवार २९ तारखेलाच जाहीर करु

#### जरांगे पाटील यांनी टाकला नवा डाव



जालना । प्रतिनिधी

प्रत्येक मतदारसंघात एकच उमेदवार उभा राहील यासाठी गुरूवारी बैठक झाली. एकच उमेदवार मतदार संघात निश्चित केला जाईल, उमेदवार निश्चित झाल्यानंतर ईतर इच्छुकांनी उमेदवारी अर्ज मागे घ्यावे. २९ –३० तारखेला आमचे उमेदवार जाहीर करू, असे मनोज जरांगे ◀◀ पान २ वर

#### » मनोज जरांगे पाटील यांना धमकी

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांना धमकी देण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. एका युट्यूबच्या कॉमेंट बॉक्समधून ही धमकी मिळाल्याचे समजत आहे. बजाज बिश्नोई लीडर नावाच्या फेक हँडलवरून ही जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. १० मिनिटांत मनोज जरांगे पाटील यांचा कार्यक्रम करणार अशी धमकी यात देण्यात आली आहे.

# निष्ठेला फळ: केजमधून पृथ्वीराज साठे, आष्टीत शेख महेबुब

## शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून ४५ जणांची पहिली यादी जाहीर

### बारामतीमध्ये पुन्हा एकदा पवार विरुद्ध पवार महामुकाबला!







पुणे । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पवार पक्षाची पहिली यादी पुण्यामध्ये प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी जाहीर केली असून ४५ जणांची नावे त्यात आहेत. शरद पवारांनी पुन्हा एकदा निष्ठावंतांना न्याय देण्याचे काम केले असून केजमधून पृथ्वीराज साठे तर आष्टीत मतदार संघात शेख महेबुब यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. नगर जिल्ह्यातील शेवगावमधून प्रतापराव ढाकणे यांना संधी देण्यात आली आहे. त्यामुळे पवारांच्या पक्षात निष्ठेला फळ मिळाले असून कार्यकर्त्यांमधून आनंद व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान बीड, माजलगाव आणि परळीतील उमेदवारांची नावे पहिल्या यादीत आली नाहीत.**

महाविकास आघाडीतील ठाकरे सेनेने आपले ६५ उमेदवार जाहीर केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी शरद पवार गटाने आपले ४५ उमेदवार जाहीर केले आहेत. अगोदर जयंत पाटील यांनी ४४ नावे जाहीर केले होते. मात्र अजित पवार गटाने ४५ नावे जाहीर केल्याने तुम्ही ४४ उमेदवार जाहीर करीत आहात का? असा प्रश्न पत्रकार परिषदेत पाटील यांना विचारताच त्यांनी ४५ वे नाव जाहीर केले. बीड जिल्ह्यात शरद पवार गटाची उमेदवारी कोणाला मिळेल, याविषयी उत्सुकता होती. आष्टी मतदार संघात भाजपचे माजी मंत्री सुरेश धस, माजी आ. भीमराव धोंडे, साहेबराव दरेकर, शेख महेबुब तर केज मतदार संघातून पृथ्वीराज साठे, संगिता ठोंबरे, अंजली घाडगे यांची नावे चर्चेत होती. मात्र पवारांनी निष्ठावंतांना न्याय देत आष्टीतून शेख महेबुब तर केजमधून पृथ्वीराज साठे यांना उमेदवारी ◀◀ पान २ वर

### केजमध्ये बंडखोरी होणार?





केजमध्ये शरद पवार गटाकडून पृथ्वीराज साठे यांना उमेदवारी जाहीर झाली असून संगिता ठोंबरे आणि अंजली घाडगे या सुध्दा इच्छुक होत्या. ठोंबरे यांनी अपक्ष निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असून अंजली घाडगे काय भुमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एकंदरीत साठे यांना बंडखोरीचा सामना करावा लागणार असल्याचे दिसते.

### आष्टीत धस, धोंडे काय करणार?





आष्टीत पवारांनी शेख महेबुब यांना उमेदवारी दिल्याने सुरेश धस आणि भीमराव धोंडे हे नेमकी काय भुमिका घेतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. धोंडे यांनी अपक्ष निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असून त्यांनी अर्जही दाखल केला आहे. आष्टीची जागा भाजपला सुटली तर आजबे काय करणार आणि आजबेंना उमेदवारी दिली तर धस काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### त्या बैठकीमुळे शेख महेबुब यांना उमेदवारी

जरांगे पाटील आणि मुस्लिम धर्मगुरु यांच्या तसेच पवारांच्या चर्चेत बीड जिल्ह्यात मुस्लिम समाजातील एकास उमेदवारी देण्याचे ठरले असल्याची चर्चा आहे. शेख महेबुब हे शरद पवार यांचे खंदे समर्थक असून राज्यस्तरावर ते पक्षाचे काम करीत असून आष्टी मतदार संघात त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. त्यामुळे त्यांना संधी देण्यात आली असून महेबुब भाई यांना उमेदवारी दिल्याने त्याचा इतर पाच मतदार संघात फायदा होऊ शकतो.

### अजित पवारांना घरातच घेरण्याचा डाव





बारामतीमध्ये युगेंद्र पवार यांना शरद पवारांनी उमेदवारी दिल्याने अजित पवार यांना घरातच घेरण्याचा डाव असल्याचे म्हटले जात आहे. काका विरुध्द पुतणे अशी लढत होणार असून अजित दादांना बारामतीत गुंतवून ठेवण्याची शरद पवारांची ही रणनिती आहे.

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या पहिल्या यादीतील उमेदवार

- जयंत पाटील – इस्लामपूर
- राजेश टोपे– घनसावंगी
- मेहबूब शेख– आष्टी
- रोहित पवार– कर्जत जामखेड
- जितेंद्र आव्हाड– कळबा मुंब्रा
- पृथ्वीराज साठे– केज
- प्रताप ढाकणे– शेवगाव
- युगेंद्र पवार – बारामती
- हर्षवर्धन पाटील– इंदापूर
- सुधाकर भालेराव– उदगीर
- चंद्रकांत दानवे– भोकरदन
- रोहिणी खडसे– मुक्ताईनगर
- राणी लंके– पारनेर
- रोहित आर. आर. पाटील– तासगाव

(सविस्तर यादी पान २ वर)

### » शेवगावमधून प्रतापराव ढाकणे



शरद पवारांच्या पहिल्या यादीत शेवगावमधून माजी खा. स्व. बबनराव ढाकणे यांचे सुपुत्र प्रतापराव ढाकणे यांना उमेदवारी देण्यात आली असून त्यांचा सामना भाजपच्या आ. मोनिका राजळे यांच्याशी होणार आहे. ढाकणे यांना उमेदवारी देऊन शरद पवारांनी वंजारी समाजाची सहानुभुती मिळवण्याचा प्रयत्न केला आहे.

### आज भाजपची दुसरी यादी

मुंबई– भाजपने पहिल्या यादीमध्ये ९९ उमेदवारांची नावे जाहीर केली होती. आता शुक्रवारी दुसरी यादी जाहीर करण्यात येणार असून महायुतीमध्ये २७८ जागांवर सहमती झाल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली. ◀◀ पान २ वर

# गेवराईतून आ.पवार अपक्ष निवडणूक लढवणार

### जो पर्यंत पंडितांची जुलूमशाही संपत नाही, तो पर्यंत मैदान सोडणार नाही–आ.लक्ष्मण पवार



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई मतदारसंघातून, जो पर्यंत पंडितांची जुलूमशाही संपत नाही. तो पर्यंत , मैदान सोडणार नाही. विकास कामाच्या माध्यमातून जनतेसमोर जाणार असून, मतदारसंघातील माझ्या कार्यकर्त्यांच्या जीवावर अपक्ष म्हणून निवडणूक लढविणार असून, काहीही झाले तरी, मागे हटणार नाही. अशी घोषणा आमदार लक्ष्मण पवार यांनी येथे बोलताना केली आहे.

गेवराई मतदारसंघाचे आमदार लक्ष्मण पवार यांनी गुरूवार ता. २४ रोजी सकाळी अकरा वाजता ◀◀ पान २ वर

### गेवराईत अजित पवार गटाकडून विजयसिंह पंडित यांची उमेदवारी दाखल



बीड । प्रतिनिधी

**जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी गुरुवारी लाडक्या बहिणींच्या सोबतीने गेवराई विधानसभा मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा अधिकृत उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला. यावेळी लाडक्या भगिनींच्या प्रतिनिधी म्हणून वैशालीताई कांडेकर, मीनाताई पिसाळ, तनुजाताई पठाण आणि विजयमाला राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.**

विजयसिंह पंडित यांनी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी घरातून निघताना शिवाजीराव दादा पंडित आणि ◀◀ पान २ वर

### रमेश आडसकर, संदिप क्षीरसागर, राजेभाऊ फड यांच्यावर आज मोहर?

#### आडसकरांचा प्रवेश होणार; कार्यकर्त्यांच्या गाड्या मुंबईकडे रवाना



बीड । प्रतिनिधी

शरद पवार गटाकडून पहिल्या यादीत केज आणि आष्टीची उमेदवारी जाहीर करण्यात आली. तर दुसऱ्या यादीत शुक्रवारी दुपारी माजलगावमधून रमेश आडसकर, बीड –संदिप क्षीरसागर आणि परळीतून राजेभाऊ फड यांच्या नावावर मोहर लागणार आहे. आडसकर यांचा प्रवेश देखील शरद पवारांच्या उपस्थितीत होणार असून त्यांच्या समर्थकांच्या गाड्या गुरुवारी रात्री मुंबईला रवाना झाल्या आहेत.

शरद पवार गटाची पहिली यादी ४५ जणांची जाहीर करण्यात आली असून शुक्रवारी दुसरी यादी जाहीर करण्यात येणार असल्याचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सांगितले आहे. ◀◀ पान २ वर

#### » तीन निष्ठावंत, दोन आयात उमेदवार?

शरद पवारांकडून बीड जिल्ह्यातील ६ पैकी ५ मतदार संघात उमेदवार देताना ३ निष्ठांतांना तर दोन आयात उमेदवारांना संधी दिली जाण्याची शक्यता आहे.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२४ ऑक्टोबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४.०० क्विंटल | २,६०० | २,८२६ | २,७१३ |
| ज्वारी/हायब्रिड : ८४.५० क्विंटल | १,८०० | २,८९९ | २,३३९ |
| मका/लोकल :३०.०० क्विंटल | २,४८१ | २,४८१ | २,४८१ |
| तूर :७.५० क्विंटल | ८,६०० | ८,६०० | ८,६०० |
| उडीद : २२.५० क्विंटल | ४,४०१ | ७,७५० | ६,६४८ |
| बाजरी: ३८.०० क्विंटल | २,१३७ | २,६७१ | २,५०१ |
| मुग : १२.५० क्विंटल | ५,८०१ | ७,२५० | ६,७५७ |
| सोयाबीन: ९४३.५० क्विंटल | ३,३०० | ४,४५० | ४,०८१ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ६,००१ | ७,००० | ६,५०० |

# लाडक्या बहिणींच्या सोबतीने धनंजय मुंडे यांनी भरला उमेदवारी अर्ज

### मी कोणतीही निवडणूक हलक्यात घेत नाही, केलेली कामे घेऊन लोकांत जाणार–धनंजय मुंडे

### धनुभाऊ जिंकतील हा मला पूर्ण विश्वास, प्रचारासाठी उतरणार मैदानात–आ.पंकजा मुंडे




परळी वै । प्रतिनिधी

**कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्या भगिनी तथा विधान परिषद सदस्य आ. पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रीतमताई मुंडे यांच्यासह परळी मतदारसंघातील लाडक्या बहिणींच्या सोबतीने आपला उमेदवारी अर्ज आज परळी येथील तहसील कार्यालयात दाखल केला आहे.**

धनंजय मुंडे यांनी साध्या पद्धतीने, कोणतेही शक्ती प्रदर्शन न करता दुपारी १ वाजेच्या दरम्यान आपला उमेदवारी अर्ज दाखल केला, यावेळी स्वतः आ.पंकजाताई मुंडे यांनी सुचकाची भूमिका निभावली. अर्ज दाखल करण्यापूर्वी नाथरा येथील निवासस्थानी धनंजय मुंडे यांचे त्यांच्या मातोश्री रुक्मिणीबाई पंडितराव मुंडे यांनी औक्षण करून आशीर्वाद दिले. यावेळी सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे व धनंजय मुंडे यांच्या ज्येष्ठ भगिनी शकुंतलाताई केंद्रे या उपस्थित होत्या. त्यानंतर धनंजय मुंडे यांनी नाथरा येथील ग्रामदैवताचे दर्शन घेऊन गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृतीस्थळी पांगरी येथील गोपीनाथ गडावर जाऊन स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांना नमन केले. परळी शहरात आल्यानंतर बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथांच्या मंदिरात जाऊन विधिवत पूजन करून धनंजय मुंडे यांनी दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. त्यानंतर पिता स्वर्गीय पंडित अण्णा मुंडे यांच्या कनेरवाडी परिसरातील समाधीस्थळी जाऊन अभिवादन करत आशीर्वाद घेतले. परळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा त्याचबरोबर रेल्वे स्थानक परिसरातील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर धनंजय मुंडे हे आपल्या भगिनी आ.पंकजाताई, डॉ.प्रीतम ताई यांसह सहकाऱ्यांच्या समवेत तहसील कार्यालयात अर्ज सादर करण्यासाठी दाखल झाले. यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना आपण कोणतीही निवडणूक हलक्यात घेत नाही, स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक असो, लोकसभा असो किंवा विधानसभा ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# घोडा मैदान टप्प्यात आले...!

महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाला आता रंग चढू लागला आहे. निवडणूक मैदान आता सजू लागले आहे. महायुतीचा घटक पक्ष भारतीय जनता पक्षाने आपली ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करुन आघाडी घेतली आहे. महायुतीचा दुसरा घटक पक्ष राष्ट्रवादी अजितदादा पवार गटाने थेट एबी फॉर्म देत ३८ जणांना उमेदवारी तिकीट देऊ केले आहे तर तिसरा घटक पक्ष शिवसेना एकनाथ शिंदे गट यांनी आपली ४५ जणांची यादी जाहीर केली. यादीवर घराणेशाहीचा छाप आहेच. दरम्यान महाआघाडीकडून शरद पवार यांची उमेदवारांची यादी गुरूवारी जाहीर करण्यात आली. याशिवाय ठाकरे शिवसेनेच्या उमेदवारांनी एबी फॉर्म दिले आहेत, असे संजय राऊत सांगत आहेत. महाआघाडीचा जागावाटप फॉर्म्युला ठरला अशा वार्ता आहेत. तसेच मुंबईत काही जागांवर मतभेद असल्याचे सांगितले जाते आहे. ठरलेल्या फॉर्म्युल्यानुसार काँग्रेस १०५ जागा ठाकरे गट ९५ जागा आणि शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला ८४ जागा मिळणार आहेत.

आता तिकीट नाकारलेले, युती, आघाडी शिवाय अन्य पर्याय शोधतील, जरांगेच्या मराठाशक्तीचे आणि तिसऱ्या महापरिवर्तन महाशक्तीचे सगळे उमेदवारही अद्याप जाहीर झालेले नाहीत. बंडखोर आणि एमआयएम, वगैरेही भिडू लढाईच्या पवित्र्यात आहेत. मनसेने काही उमेदवार जाहीर केले व सुमारे शंभर जागा लढवणार असे सांगितले आहे. एकुणच सत्तासंघर्षाचे मैदान आकारु लागले आहे. सजू लागले आहे. महायुतीने लोकसभेवेळची चूक यावेळी दुरुस्त केली आणि मित्र पक्षात समन्वय ठेवत, प्रसंगी एकमेकांना उमेदवार देत उमेदवारी जाहीर करण्यात आघाडी घेतली. तथापि या बाबतीत महाआघाडीत तूटणार काय इतके ताणले गेल्याने यादी तर जाहीर झाली नाहीच पण काँग्रेस व शिवसेना उद्धव ठाकरे गट यांच्यात ताण निर्माण झाला. काँग्रेसच्या दिल्लीतील श्रेष्ठींनी आपले प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांना मागे ढकलून शिवसेना ठाकरे गटासमोर मान तुकवली व विदर्भासह महाराष्ट्रातील शिवसेनेला हव्या असलेल्या जागा देण्यासाठी मान डोलावली, असे प्रारंभिक चित्र दिसते आहे. संपूर्ण तिकीट वाटप आणि बंडाचे झेंडे बघून यावर मत मांडता येईल पण आज तरी काँग्रेस हायकमांडने प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांना मागे ढकलत उद्धव ठाकरे यांची मैत्री महत्त्वाची ठरवली आहे. प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले यांचे पक्षाचे व कार्यकर्त्यांचे हित बघणे हे कर्तव्य आहे. त्या कर्तव्य भावनेतून त्यांनी काँग्रेसला सुमारे १२५ ते १३० जागा मागितल्या होत्या.

काँग्रेसच आघाडीत जागावाटपात मोठा भाऊ अशी स्पष्ट भूमिका घेतली होती आणि कुणाच्या किती जागा येतात हे बघून ज्याच्या जास्त जागा, त्याचा मुख्यमंत्री असे ठणकावले होते. पण ठाकरे यांनी चेहरा जाहीर करा, मोठा भाऊ कोण ते सांगा असे म्हटले होते. काँगेस विदर्भातील एकही जागा ठाकरेंना सोडायला तयार नव्हती, जोडीला काँग्रेसची मुंबईतील शक्ती ठाकरेंच्या पाठी उभी करताना मुंबईत काँग्रेसने जागावाटपात चांगला हिस्सा मागितला होता. नाना पटोले चर्चेला व भूमिकेला चिकटून होते पण शिवसेनेने आघाडीतून बाहेर पडू इतके ताणले, पटोले चर्चा करणार तर शिवसेना चर्चेला येणार नाही अशी भूमिका घेतली. अखेर दिल्लीत काँग्रेस हायकमांडने बैठक घेतली व नाना पटोले यांना मागे खेचत, बाळासाहेब थोरात यांना समन्वयक म्हणून मातोश्रीवर पाठवले. आता काँग्रेसने १०५ जागा लढवाव्यात आणि ठाकरे शिवसेनेने ९५ असे काही ठरते आहे. पण हे आकडे अंतिम नाहीत. काँग्रेससारखा राष्ट्रीय पक्ष आपल्या प्रदेश अध्यक्षाला मागे खेचून शिवसेना ठाकरे गटाच्या हो ला हो करतो आहे त्यामागे काँग्रेस हायकमांडची काही भूमिका असावी, रणनीती असावी. एकतर काँग्रेसला काहीही करुन भाजपाला रोखायचे आहे. महाराष्ट्रासारखे मोठे व देशाची आर्थिक राजधानी असलेले राज्य भाजपाकडे जावू द्यायचे नाही, त्यासाठी काहीही अशी हायकमांडची भूमिका असू शकते. सोबत जागा कमी मिळाल्या तर सांगली पॅटर्न करुन म्हणजे बंडखोरी करुन आपले उमेदवार निवडून आणायचे, असेही ठरु शकते. लोकसभेच्या वेळी सांगलीत शिवसेनेची ताकद नसताना शिवसेनेने एकतर्फी आपला उमेदवार जाहीर केला आणि तो उमेदवार रेटला पण काँग्रेसने अपक्ष उमेदवार उभा केला व निवडून आणला आणि त्यास पक्षात सहभागी केले. कदाचीत हाच फॉर्म्युला काँग्रेस विदर्भात वापरू शकते, त्याच हेतूने पटोले यांना काँग्रेसने मागे खेचले असावे. काँग्रेस हायकमांडची ही रणनीती असू शकते पण त्यातून मेसेज चांगला गेलेला नाही. सांगली पॅटर्नमुळे पक्षाची विश्वासार्हता उरत नाही. आघाडीधर्माचे पालन होत नाही आणि प्रदेश अध्यक्ष या मानाच्या पदाचे महत्त्व काँग्रेसश्रेष्ठीच्या लेखी काय आहे हे पण दिसून येते.

महाआघाडी व महायुती काही जागांवर वाद आहेत. ते शेवटपर्यंत राहणार पण ताळमेळ घालत, समजूतीने पावले टाकणे ही गरज असते. त्यात जो यशस्वी झाला त्याने अर्धे यश मिळवले असे मानले जाते कारण फार ताणले की कार्यकर्ते संतापतात, राग धरतात आणि सुडाची भावना बाळगतात. त्यातच ज्याच्या जास्त जागा त्याचा मुख्यमंत्री असे सुत्र असल्याने पाडापाडीचे उद्योग होतातच. जोडीला मुख्यमंत्री पदाचे दावेदार हमखास अडचणीत आणले जातात. आता एक दोन दिवसात जागावाटपाच्या याद्या जाहीर होतील, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षात मोठी फूट आणि व्हेकन्सी निर्माण झालेने दोन्ही पक्षात इनकमिंग मोठ्या प्रमाणात केले जात आहे. शरद पवारांनी माणसे हेरुन गावोगावी हिंडून बरीचशी भरती केली. तुलनेने उद्धव ठाकरे फारसे हिंडलेले नाहीत. शिवसेनेत इनकमिंग सुरू आहे पण ते शरद पवारांप्रमाणे हेरुन नाही. बुधवारी संध्याकाळी उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेची ६५ उमेदवारांची यादी जाहीर केली. शिवसेनेची सर्व ताकद मोठा भाऊ आणि चेहरा यासाठी काम करताना दिसते आहे आणि या दोन्ही मुद्यावर शिवसेना बॅकफूटवर गेली आहे. येत्या दोन तीन इतर मेदवार जाहीर होतील, अर्ज दाखल केले जातील, लहान मोठ्या बंडखोऱ्या होतील आणि अर्जमाघारी नंतरच चित्र स्पष्ट होईल तूर्त निवडणूक मैदान सजू लागले आहे.

## काँग्रेसची ४८ उमेदवारांची पहिली यादी जाहीर

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ साठी आता सर्वपक्षीय उमेदवारांच्या याद्या जाहीर होत आहेत. महाविकास आघाडीच्या यादीची उत्सुकता लागली होती. गुरूवारी संध्याकाळी काँग्रेसने आपली पहिली उमेदवारी यादी जाहीर केली आहे.**

पहिल्या उमेदवारी यादीमध्ये ४८ उमेदवारांचा समावेश आहे. काँग्रेसच्या पहिल्या यादीमध्ये माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात यासारख्या ज्येष्ठ आमदारांचा समावेश आहे. दरम्यान, महाविकास आघाडीतील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष यांच्याकडून विधानसभा निवडणुकीसाठी पहिली यादी जाहीर करण्यात आलेली आहे. ठाकरेंच्या शिवसेनेकडून ६५ तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून ४५ उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे.

## राजेश टोपे महाविकास आघाडीकडून उमेदवारी अर्ज दाखल

**घनसावंगी । प्रतिनिधी**

घनसावंगी विधानसभा मतदार संघातून राजेश टोपे यांनी सहाव्यांदा महाविकास आघाडीच्या तीन खासदार व प्रमुख पदाधिकाऱ्याच्या उपस्थितीत प्रचंड शक्तीप्रदर्शन करीत तुतारी घेऊन उभा असलेला माणूस या चिन्हावर आपला उमेदवारी अर्ज भरला असून यावेळी शिवसेना उबाठा गटाचे खासदार संजय जाधव,काँग्रेसचे खासदार डॉ.कल्याण काळे,राष्ट्रवादीचे खासदार डॉ.अमोल कोल्हे,मानवी हक्क अभियानचे मिलिंद आवाड,भीमराव हत्तीआंबरे,राजाभाऊ देशमुख,उत्तमराव पवार,जिल्हाध्यक्ष निसार देशमुख,नंदकुमार देशमुख,सतीश टोपे,तात्यासाहेब चिमणे यांच्यासह अनेक महाविकास आघाडीचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने मतदार संघातील कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी खासदार संजय जाधव यांनी चोवीस तास मतदार संघासाठी देणारे राजेश टोपे यांना मताधिक्याने निवडून द्या व राज्यात पुन्हा महाविकास आघाडीचे सरकार आणा असे आवाहन केले तर खा.कल्याण काळे यांनी महायुती सरकारवर टीका करत लाडकी बहिण योजनेचे पंधराशे रुपये देऊन या सरकारने शेतकऱ्याच्या सोयाबीन चा भाव सहा हजारावरून अदोतीशसे रुपये केला आणि तेल एकशे चाळीस रुपये किलो केले असे आरोप करत महाविकास आघाडीचे सरकार आणण्यासाठी राजेश टोपे यांना पुन्हा मोठ्या मताधिक्याने निवडून द्या



असे संबोधित केले.तर ख.अमोल कोल्हे यांनी कोरोना काळात संपूर्ण महाराष्ट्राला वाचविणाऱ्या राजेश टोपे यांना पुन्हा मंत्री करण्यासाठी निवडून देण्याचे आवाहन केले.तर राजेश टोपे यांनी गेल्या पाच वर्षात आपण मतदार संघात जे विकास कामे केली त्याचा लेखाजोखा मांडत प्रत्येक कार्यकर्त्याने मतदार संघातील प्रत्येक घराघरात जाऊन तुतारी या चिन्हावर मतदान करून आपला विजय रथ सहाव्यांदा पुढे नेऊन मतदार संघातील प्रत्येक घटकांचा विकास करण्यासाठी व राज्यातून जातीभेद व मनुवादी सरकार हद्दपार करण्यासाठी तसेच राज्यात शरदचंद्र पवार,उद्धव ठाकरे,नाना पटोले यांच्या महाविकास आघाडीचे सरकार आणण्यासाठी तुतारी घेऊन उभा असलेला माणूस या चिन्हावर प्रचंड मताधिक्य द्यावे असे आवाहन केले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगन्नाथ काकडे यांनी केले.

## प्रियंका गांधी यांचा उमेदवारी अर्ज दाखल

वायनाड । वृतसस्था

काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी यांनी रोड शोनंतर वायनाड लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत भाऊ राहुल गांधी, आई सोनिया गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हेही उपस्थित होते. नामांकन अर्ज दाखल करण्यापूर्वी प्रियंका गांधी यांनी मी १७ वर्षांची असताना १९८९ मध्ये पहिल्यांदा वडिलांसाठी प्रचार केला होता. तेव्हापासून या ३५ वर्षांत आई आणि भावासाठी मते मागितली. आता प्रथमच मी स्वत:साठी समर्थन मागत आहे, असे म्हटले. वायनाड हा देशाचा एक प्रदेश आहे, जिथून २ खासदार आहेत. एक अधिकृत खासदार आणि दुसरा अनधिकृत खासदार. दोघेही वायनाडसाठी काम करतील, असे राहुल गांधी म्हणाले. प्रियंका गांधी पहिल्यांदाच निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या विरोधात भाजपने नव्या हरिदास यांना उमेदवारी दिली आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी केरळमधील वायनाड आणि उत्तर प्रदेशातील रायबरेली लोकसभा मतदारसंघातून विजयी झाले होते. नंतर त्यांनी गांधी घराण्याची पारंपरिक जागा रायबरेली निवडली आणि वायनाड सोडली. येथे १३ नोव्हेंबरला मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला निकाल लागणार आहे.

## मनीषा बिक्कड यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्कार

**बीड । प्रतिनिधी**

**समाजातील व्यसनमुक्ती करण्यासाठी सातत्याने केलेल्या कार्याबद्दल मनीषा बिक्कड यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले रविवार दिनांक २० ऑक्टोबर रोजी व्हीएसव्हीएसएस सोशल फाउंडेशन यांच्यावतीने थेरगाव पुणे या ठिकाणी राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्कार सोहळा २०२४ चे आयोजन करण्यात आले होते.**



या सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल काही मान्यवरांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या पुरस्कार सोहळ्यातील प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार डॉ. अशोक नगरकर, मा. भिडेवाडाकार विजय वडवेराव, सीने अभिनेत्री सौ प्रियंका शिंदे, अभिनेते संतोष नलावडे यांच्या हस्ते श्रीमती मनीषा बिक्कड यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. शैक्षणिक व सामाजिक व्यसनमुक्ती क्षेत्रातील योगदानाबद्दल मनिषा बिक्कड यांना महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०२४ ते सन्मानित करण्यात आले. सामाजिक पुरस्कार मिळण्याची अशी संधी यापूर्वीही मनिषा बिक्कड यांना दिनांक २ ऑक्टोबर २०२२ रोजी एस. के. मीनागिरे (सहायक आयुक्त समाज कल्याण विभाग महाराष्ट्र शासन) यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त व्यसनमुक्ती सेवादुत पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले होते.

## घड्याळ चिन्ह अजित पवारांनाच!

### सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय मात्र अटिंचे उल्लंघन केल्यास कारवाई होणार

**दिल्ली । वृतसंस्था**

**विधानसभा निवडणुकीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला घड्याळ चिन्ह कायम ठेवण्याची परवानगी दिली. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला खुलाश्यासह चिन्हाचा वापर आणि ते त्यांच्या निर्देशांचे उल्लंघन करणार नाहीत, असे ४ नोव्हेंबरपर्यंत नवीन हमीपत्र दाखल करण्यास सांगितले आहे.**

निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत तुम्ही (अजित पवार गट) आमच्या निर्देशांचे उल्लंघन करणार नाही, असे नवीन हमीपत्र दाखल करा. तुम्ही स्वतःसाठी लाजीरवाणी परिस्थिती निर्माण करू नका. जर आमच्या आदेशांचे उल्लंघन केले गेले असेल तर अवमानना कार्यवाही सुरु करावी लागेल, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने सुनावले आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी ६ नोव्हेंबरला होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्ह प्रकरणावर गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. निवडणूक आयोगाकडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि घड्याळ चिन्ह अजित पवारांना देण्यात आले. या निर्णयाला शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान देत याचिका दाखल केली आहे.

## पान १ वरून...

### आमचे उमेदवार २९ तारखेलाच

पाटील म्हणाले. अंतरवाली सराटी येथे इच्छुक उमेदवारांच्या बैठकीपूर्वी ते पत्रकारांशी संवाद साधत होते. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी शेवटच्या दिवशी उमेदवाराचे नाव जाहीर करण्याचे सांगत सगळ्याच राजकीय पक्षांना आणि प्रस्तापितांना अडचणीत टाकत नवा डाव टाकला आहे. निवडणुकीसाठी जातीय समीकरण जुळवण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. मराठा – ओबीसी असा कोणताही वाद नाही तो वाद फक्त येवल्यावाल्याने लावला. जातीय समिकरण ठरल्यानंतर मी दौरे करणार असल्याची माहिती मनोज जरांगे यांनी दिली. एकाच जातीच्या पाठिंब्यावर निवडणूक लढवता येणार नाही. सर्वांना सोबत घेऊन राजकीय समिकरण जुळले की कोणत्या मतदारसंघात उमेदवारी जाहीर करायची हे जाहीर करणार असल्याचे त्यांनी सांगितले. काही ठिकाणी लढायचे तर काही ठिकाणी तेथील उमेदवार पाहून उमेदवाराला बळ देवून पाडापाडी करणार आसल्याचे ते म्हणाले. मतदारसंघात बैठक घेऊन सर्वानुमते एक उमेदवार ठरविण्यासाठी सांगितले होते. परंतु ते काही जुळले नसल्याने बैठक बोलावली असल्याचे जरांगे पाटील म्हणाले. राजकारणाच्या हट्टापायी समाजाचे नुकसान होणार नाही याची काळजी घेवू. आता तर आपण जागलो तर पाच वर्षे आम्हाला न्याय मिळेल, शेतकरी गोरगरीब कष्टकरी यांचे प्रश्न मार्गी लागणार आहेत.

--------

### हक्काच्या पैशासाठी

पदाधिकाऱ्यांनी कर्नाटक सीमाभागात सभांचा धडाका केला आहे. सोशल मीडियासह गावागावांतील स्वाभिमानीच्या शाखांमधून शेतकऱ्यांना प्रबोधन करण्यात येत आहे. महाराष्ट्र, कर्नाटकातून मोठ्या प्रमाणावर शेतकरी उपस्थित राहतील यादृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. सभेस स्वाभिमानीचे अध्यक्ष राजू शेट्टी यांच्यासह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संदीप जगताप, स्वाभिमानी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जालंदर पाटील, शिस्तपालन समितीचे अध्यक्ष प्रकाश पोफळे, माजी जिल्हा परिषद सदस्य सावकार मादनाईक यांच्यासह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांचे जिल्हाध्यक्ष, कार्यकारिणी सदस्य उपस्थित राहणार आहेत. गतवर्षी तुटलेल्या उसाचा अंतिम भाव प्रतिटन दोनशे रुपये तसेच या वर्षी तुटणाऱ्या उसाला एफआरपीपेक्षा अधिक किती मागायचे याचा निर्णय ऊस परिषदेत होणार आहे. प्रतिटन तीन हजारांपेक्षा जादा दर देणाऱ्या कारखान्यांनी पन्नास रुपये तर तीन हजारांपेक्षा कमी दर देणाऱ्या कारखान्यांनी शंभर रुपये देण्याचा सर्वमान्य तोडगा स्वाभिमानीच्या आंदोलनावेळी निघाला होता. एफआरपीपेक्षा जादा भाव देण्यासाठी शासनाचे परवानगी घेण्यासाठी कारखानदारांनी प्रस्ताव दिले होते.

-----------

### निष्ठेला फळ: केजमधून पृथ्वीराज साठे,

जाहीर केली आहे. इस्लामपूरमधून जयंत पाटील, काटोल मतदारसंघातून अनिल देशमुख, घनसावंगीमधून राजेश टोपे, कराड उत्तरमधून बाळासाहेब पाटील, मुंब्रा कळवा मतदारसंघातून विरोधी पक्षनेते जितेंद्र आव्हाड, बारामतीमधून युगेंद्र पवार, शेवगाव प्रताप ढाकणे, कर्जत – जामखेड रोहीत पवार, तासगाव रोहीत पाटील, मुक्ताईनगर रोहीण खडसे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. राष्ट्रवादीच्या पहिल्या यादीत ४५ जणांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर उर्वरित यादी शुक्रवारी सकाळी जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती जयंत पाटील यांनी दिली.

**राष्ट्रवादी काँग्रेसच्या पहिल्या यादीतील उमेदवार**

अनिल देशमुख– काटोल, शशिकांत शिंदे – कोरेगाव, जयप्रकाश दांडेगावकर– वसमत, गुलाबराव देवकर– जळगाव ग्रामीण, प्राजक्त तनपुरे –राहुरी, अशोकराव पवार– शिरुर, मानसिंगराव नाईक– शिराळा, बाळासाहेब पाटील– कराड उत्तर , सुनील भुसारा– विक्रमगड , विनायकराव पाटील– अहमदपूर , राजेंद्र शिंगणे– सिंदखेडराजा, चरण वाघमारे– तुमसर , प्रदीप नाईक– किनवट, विजय भांबळे–जिंतूर , संदीप नाईक– बेलापूर , बापूसाहेब पठारे– वडगाव शेरी , दिलीप खोडपे– जामनेर, सम्राट डोंगरदिवे–मुर्तिजापूर , रविकांत बोपछे– तिरोडा , भाग्यश्री अत्राम– अहेरी , बबलू चौधरी– बदनापूर, सुभाष पवार– मुरबाड, राखी जाधव– घाटकोपर पूर्व, देवदत्त निकम– आंबेगाव, संदीप वर्पे– कोपरगाव, नारायण पाटील –करमाळा , महेश कोठे–सोलापूर शहर उत्तर , प्रशांत यादव– चिपळूण, समरजीत घाटगे – कागल, प्रशांत जगताप –हडपसर

---------

### रमेश आडसकर, संदिप क्षीरसागर

माजलगावमधून रमेश आडसकर यांचे नाव फायनल असून त्यांचा अगोदर पक्षप्रवेश होणार आहे. त्यासाठी आडसकर समर्थक गाड्या घेऊन मुंबईला रवाना झाले आहेत. तसेच बीडमधून आ. संदिप क्षीरसागर यांना निष्ठेचे फळ मिळणार असून त्यांना एबी फॉर्म देण्यात आला आहे. माजलगावातून रमेश आडसकर, बीडमधून संदिप क्षीरसागरांसह परळीतून राजेभाऊ फड यांनाच उमेदवारी दिली जाणार असल्याची माहिती विश्वसनीय सुत्राने दिली आहे.

-----------------

### गेवराईत अजित पवार गटाकडून

अमरसिंह पंडित यांचे आशीर्वाद घेतले. नामलगाव येथील आशापुरक गणपती, पेंडगाव येथील जागृत देवस्थान मारोतीराया, शिवाजीनगर गढी येथील जय भवानी देवी, तलवाडा येथील त्वरिता देवी आणि गेवराई शहरातील हजरत गैबी दर्ग्यावर त्यांनी चादर चढवून सर्वांचे दर्शन घेतले. गेवराईच्या सर्वांगीण विकासासाठी शिवछत्र परिवार कायम कटिबद्ध आहे. त्यामुळे यंदा गेवराईकर मतदान रुपी आशीर्वाद देतील असा विश्वास त्यांनी यानिमित्ताने व्यक्त केला. विजयसिंह पंडित यांनी कोणताही बाढेजावपणा न करता अतिशय सध्या पद्धतीने लडक्या बहिणींच्या सोबतीने उमेदवारी अर्ज दाखल केल्याची सकारात्मक चर्चा गेवराई विधानसभा मतदारसंघात आहे. यावेळी माता भगिनी, जेष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक आणि मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------

### गेवराईतून अपक्ष निवडणूक

कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत अपक्ष निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले. यावेळी, कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणा करून, परिसर दणाणून सोडला. बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे आणि बीडच्या भाजपाने जाणीवपूर्वक डावलून विकासात अडथळा निर्माण केल्याचा आरोप आ. पवार यांनी केला होता. त्यानंतर त्यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली. महाविकास आघाडीकडून त्यांना तिकिट मिळणार असल्याचे चित्र निर्माण झाले होते. मात्र, महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून माजी मंत्री बदामराव पंडित यांना उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे,आमदार पवार यांच्या भूमिकेकडे लक्ष लागले होते. गुरूवार ता. २४ रोजी आमदार पवार यांनी कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात भूमिका जाहीर करून, अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढविणार असल्याचे जाहीर केले. गेवराई मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी आपली भावना व्यक्त करून, आमदार पवार यांनी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात उभे राहावे. आम्ही जीवाचे रान करून तुम्हाला निवडून आणू ,असा शब्द दिला. दहा वर्षापासून आमदार पवार यांनी केलेली विकास कामे. जनतेसमोर ठेवून मते मागू आणि आमदार पवारांना निवडून आणू , असा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. आ. लक्ष्मण पवार यांच्या मळ्यात गेवराई मतदारसंघातील कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. यावेळी, कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. आमदार पवार यांनी माघार घेऊ नये, असे आवाहन केले. आमदार पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, पंधरा महिन्यात माझी तब्येत चांगली नाही. म्हणून, सार्वजनिक कार्यक्रमात आलो नाही. पण, विकासाच्या कामासाठी एक ही बैठक सोडली नाही. तब्येतीकडे दूर्लक्ष करून शासकीय बैठकीला गेलो. म्हणून, विकास कामे झाली आहेत. एका दिवसात विकास निधी येत नाही. हे सर्व सामान्य माणसाला सुद्धा कळते.दहा वर्षात राजकारण बदलले आहे. असे वाटत असतानाच, पंडितांची दादागिरी संपलेली नाही. त्यामुळे, काही गोष्टी सोडता येत नाहीत. जनतेला, कार्यकर्त्यांना उघड्यावर सोडले तर देव सुद्धा मला माफ करणार नाही. अशी भावनिक साद ही आमदार पवार यांनी यावेळी बोलताना घातली. कार्यकर्त्यांची मान आमच्या खांद्यावर आहे. त्या गोष्टीचा आम्हाला कधीच विसर पडणार नाही. मात्र, माझी तब्येत ठीक नाही. दोन महिन्यांपासून पायाला जखम झाली आहे. ती अजून ही बरी झाली नाही. एक दोन दिवसात डॉक्टरांनी बोलावले आहे. फार दगदग होणार नाही. तरीही, राहीलेल्या दिवसात, मी स्वतः दिडशे गावात जाईल. पण, तुम्ही सर्वजण उमेदवार आहात ,असे समजून प्रचार करा. विरोधक भांडवल करतील, कुठेत उमेदवार ? खर सांगतो, मी अनेक गावात गेलो ही नसेल. शिवराज बाळराजे पवार, गिताभाभी यांनी जनतेला वेळ दिला. पण, मी विकास कामात कुठेही कमी पडलो नाही. मते पडली नाहीत म्हणून, त्या गावात विकास केला नाही. असा विचार मी केला नाही. उलट त्या गावांना ही निधी दिला आहे. आजारी असून ही, कर्तव्य म्हणुन सरकार दरबारी बैठकांना गैरहजर राहीलो नाही. त्या बैठकीत गेलो. मतदारसंघातील कामांचा पाठपुरावा केला. म्हणून, मतदारसंघात विकास कामे झाल्याचे आमदार लक्ष्मण पवार यांनी यावेळे सांगितले. सोबत असलेल्या कार्यकर्त्यांच्या जीवावर अपक्ष म्हणून निवडणूक लढविणार आणि जिंकणार, असा विश्वास ही आमदार पवार यांनी शेवटी बोलताना व्यक्त केला. यावेळी कार्यकर्त्यांसह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

-----------

### लाडक्या बहिणींच्या सोबतीने धनंजय

असो, प्रत्येक निवडणूक आपण पूर्ण ताकतीने लढत असतो; त्यामुळे यशाची हमखास खात्री मिळते. विरोधकांना कोण उमेदवार मिळेल किंवा आपल्या विरोधात कोण उभे असेल याबाबतची काळजी न करता मी आजवर केलेली कामे आणि माझ्या मनात असलेले विकासाचे व्हिजन घेऊन लोकांमध्ये जाणार आहे आणि स्वतःसाठी मतदान रुपी आशीर्वाद मागणार आहे, असे धनंजय मुंडे म्हणाले. मी आज महायुतीतील घटक पक्षाची नेता म्हणून आणि बहीण म्हणून धनुभाऊंच्या या निवडणुकीत आज सुचकाच्या भूमिकेत आले आहे. ही निवडणूक धनु भाऊ व मी परळीसाठी आजवर जे केले, त्या कामांच्या बळावर धनु भाऊ जिंकतील असा मला विश्वास आहे. संपूर्ण निवडणुकीत मीही आता धनुभाऊंच्या प्रचारासाठी मैदानात उतरणार आहे, असे यावेळी आ.पंकजाताई मुंडे म्हणाल्या. यावेळी विधानपरिषद सदस्य आ.पंकजाताई मुंडे, माजी खा. डॉ.प्रीतमताई मुंडे, माजी आ.डॉ.मधुसूदन केंद्रे, माजी आ.आर टी देशमुख, रा.कॉ.चे जिल्हाध्यक्ष ऍड.राजेश्वर चव्हाण, अजय मुंडे, वाल्मिक अण्णा कराड, वैद्यनाथ बँकेचे अध्यक्ष विनोद सामत, कल्याणराव आखाडे, गोविंदराव देशमुख, शिवाजी सिरसाट, विजय वाकेकर, वैजनाथराव सोळंके, भाजप तालुका प्रमुख, सतीश मुंडे, बाबुराव मेनकुदळे, बाजीराव धर्माधिकारी, जाबेर खान पठाण, शिवसेना तालुका प्रमुख व्यंकटेश शिंदे, ऍड.गोविंदराव फड, प्रा.विनोद जगतकर, राजाभाऊ औताडे, अभय मुंडे, रामेश्वर मुंडे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष सौ.प्रज्ञाताई खोसरे, दीपक देशमुख, सूर्यभान मुंडे, प्रा. मधुकर आघाव, विश्वाम्भर फड, माऊली तात्या गडदे, शिवाजीराव गुट्टे, शरद राडकर, राजा भैय्या पांडे, सत्यजित सिरसाट, श्रीहरी मुंडे, निळकंठ चाटे, पवन मुंडे, वसंत राठोड, वैजनाथ माने यांसह महायुतीचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**पंकजाताई व प्रीतमताईंनी केले औक्षण**

दरम्यान उमेदवारी अर्ज भरायला जाण्याअगोदर आ.पंकजाताई मुंडे, माजी खा.डॉ. प्रीतमताई मुंडे यांनी आपल्या यशश्री या निवासस्थानी धनंजय मुंडे यांचे औक्षण करून आगामी निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या.

--------

### आज भाजपची

मात्र अद्यापही दहा जागावर पेच कायम असल्याचे त्यांनी सांगितले. दुसऱ्या यादीमध्ये बीड जिल्ह्यातील कोणाचं नाव येतं याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

-------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि.२५ ऑक्टोबर २०२४


## निवडणूक खर्च निरीक्षकांनी विभाग प्रमुखांचा घेतला आढावा

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील आष्टी, केज व परळी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचे खर्च निरीक्षक के. रोहन राज आणि गेवराई, माजलगाव व बीड विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचे कपील जोशी यांनी आज निवडणूक खर्च विषयक कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी त्यांचे स्वागत केले. बैठकीस पथकांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.




स्थिरनिगरानी पथक तसेच भरारी पथकाच्या गेल्या काही दिवसातील कार्याचा सविस्तर आढावा निरीक्षक यांनी घेतला. तसेच निवडणुकीच्या खर्चावर नियंत्रण ठेवणाऱ्या खर्च समितीच्या सर्व अधिकाऱ्यांनी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आवश्यक ती सर्व कार्यवाही पार पाडावी अशा सूचना केल्या. यासह माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीनेही दक्षतेने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

# रस्त्यावरील सोयाबीनचे ढिगारे अपघाताला निमंत्रण

## सार्वजनिक बांधकाम, महामार्ग पोलिस,कंत्राटदारांचे दुर्लक्ष– डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील अनेक शेतकरी काढणीला आलेले मुग, उडीद, आणि सोयाबीन आदी पिके मुख्य रस्त्यावर आणुन खळे करत असल्याच्या घटना नविन नाहीत. सध्या काही ठिकाणी शेतकरी पावसाळ्यात ओले झालेले सोयाबीन मुख्य रस्त्यावर आणुन वाळु घालत सभोवताली दगडं ठेवत आहेत तर काही ठिकाणी सोयाबीनचे ढीग रस्त्यावर आढळून येतात.त्यामुळे रात्री अपरात्री अथवा पहाटे धुक्यामुळे रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या अनेक दुचाकी गाड्या चालवणा–या दुचाकी स्वारांचे अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग , महामार्ग पोलिस आणि संबंधित रस्त्याची देखभाल व दुरुस्ती करणारे कंत्राटदार यांचे मात्र याकडे दुर्लक्ष होताना दिसत असुन त्या अनुषंगाने संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची गरज असल्याचे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी सांगितले.

रस्त्यावरील सोयाबीनचा ढिग व त्याभोवती दगडांमुळे अपघात:– बाबासाहेब बांगर

पाटोदा तालुक्यातील वाघिरा येथील रहिवासी बाबासाहेब बांगर



हे काल दि.२३ बुधवार रोजी सायंकाळी ७ वाजता नातेवाईकांसोबत खंडाळा येथे जात असताना अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गा वरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान जाधववाडी येथील शेतकऱ्यांनी रस्त्यावर ओले झालेले सोयाबीन मुख्य रस्त्यावर आणुन वाळु घातले होते. त्याभोवती असलेले मोठमोठे दगड न दिसल्याने दगडावर मोटार सायकल आदळून अपघात झाला. त्यात गाडीवर मागे बसलेल्या महिलेला दुखापत झाल्याने दवाखान्यात नेऊन उपचार करावे लागले.थोडक्यात जीव वाचला.अन्यथा गंभीर घटना घडली असती असे अपघातग्रस्त बाबासाहेब बांगर यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना सांगितले.

### कंत्राटदार, महामार्ग पोलिस व सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ डी महामार्गावर मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान अतिवेगाने वाहन चालवणे तसेच पडलेल्या भेगा, रखडलेल्या कामांमुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे.त्यातच आता रस्त्यावर सोयाबीन वाळत घालुन त्याभोवती दगड ठेवणे अथवा रस्त्यावर सोयाबीनचे ढीग ठेवल्याने त्यात वाढ झाली असुन याकडे रस्त्याची देखभाल करणारे संबंधित कंत्राटदार, महामार्गावरील पोलिस यंत्रणा तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असुन संभाव्य दुर्घटना रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

## केज मतदार संघाचा चेहरा–मोहरा बदलून टाकणार – लहू बनसोडे, अपक्ष उमेदवार

**केज । प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून मी केज विधान सभा २०२४,चे अपक्ष किंवा शिवसेना, एकनाथ शिंदे गट. उमेद्वार लहू बनसोडे. केज विधान सभेला निवडणुकी साठी उभा रहात आहे.



केज विधान सभा २०२४, चे अपक्ष उमेदवार म्हणून पाथरा ता. केज. जि. बिड. हे केज मतदार संघातून अपक्ष निवडणूक लढवत आहेत कुठलाच राजकिय वारसा नसलेले, पदवी पर्यंत शिक्षण घेतलेले, मतदार संघाचा अभ्यास असणारे, जनसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे, अन्याया विरुद्ध लढणारे जनतेच्या ज्वलंत प्रश्नाना न्याय देणारे तसेच अन्याया विरुद्ध लढणारे व्यक्तिमत्व असणारे लहू बनसोडे साधे, सरळ आणि गरीब, होतकरु यांची जाण असणारे व्यक्तिमत्व असून जनतेसाठी सदैव धडपडणारे एस. सी उमेद्वार आहेतएकनाथ शिंदे शिवसेना, अपक्ष लढत आहे

केज मतदारसंघात स्त्रिया सुरक्षीत नाहीत अशा एक ना अनेक समस्या आहेत. एकनाथ शिंदे शिवसेना गटाकडून अन्यथा अपक्ष निवडणूक लढवणारे उमेद्वार यांनी सांगीतले कि आज मतदार संघात शेतकरी अनेक समस्या नी घेरला आहे अत्यंत हाल चालू आहेत, केज येथे बस डेपो नाही, मागील एकाही लोकप्रतीनीधींनी फक्त विकासाचा डांगोरा पिटला परंतु विकास केला नाही परंतु छोटे राज्य, छोटा जिल्हा विकास झपाट्याने होतो, शेतक्यांना लाईट फुकट देण्यासाठी प्रयत्य करणार, बहुजनांच्या मागासवर्गीयांच्यां समस्या सोडवणार विधान सभेत बरून मतदार संघाच्या समस्या सोडव ण्यासाठी एक वेळ जनतेने मला संधी द्यावी. सुशिक्षीत बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देणार, शासनाला विनंती करून सर्व समस्या सोडवणार, लाडक्या बहिणी साठी ८००० रु महिना करणार,

अंबाजोगाई जिल्हाकरणार.

शेतकरी जगला पाहिजे. आज जिल्हा परिषद शाळा बंद पडत आहेत गोरगरीबां ची मुले शिक्षणा पासून कोसो दूर आहेत त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणार जेणेकरून गरीब मुले शिकली पाहिजेत. शेतकर्यां ना उपयुक्त योजना आणणार, बाजार तळ बांधणार, पत्रकारासाठी शासकिय पत्रकार भवन बांधणार आतापर्यंत लोकांचा प्रतिसाद चांगला आहे. प्रत्येक घरोघरी भेटी देवून जनतेचा आशिर्वाद घेणार आणि जनतेच्या पाठिंब्या वर आमदार होणारच, शिवसेनेकडून उमेद्वारी नाही मिळाली तरी अपक्ष लढवणार. असे श्री लव्हू बनसोडे यांनी पत्रकार परिषद घेवून सांगीतले. शेतकर्यांना कर्ज माफी, हमीभाव, दिला जाईल तसेच जुने प्रतिनिधी सांगतात जनतेचा विकास केला. परंतु नेमका विकास म्हणजे काय केला ? जुनी बील्डींगझाल्या वर नवी बांधावीच लागते. यांनी जनतेला फक्त आश्वासने च दिली मी जनतेची कामे करूनच दाखवणार. एक वेळ जनतेने मला संधी द्यावी.

## युवासेना बीड जिल्हा पदाधिकाऱ्यांची यादी जाहीर!

### जिल्हाप्रमुख जगताप, मुळूक यांच्याकडून युवासेना पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन



बीड । प्रतिनिधी

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशिर्वादाने व शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व संसदरत्न खासदार मा. डॉ. श्रीकांतजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली युवसेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांच्या आदेशानुसार आणि जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक तसेच युवसेना मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे यांच्या विनंतीनुसार काल दि. २४ ऑक्टोबर रोजी सायं ६.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना पक्षाच्या युवासेना बीड जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीची यादी जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये सागर विजय बहिर विभागीय निरीक्षक बीड लोकसभा,

किशोर भास्करराव गिराम जिल्हाध्यक्ष बीड गेवराई विधानसभा, रविराज प्रकाशराव बडे जिल्हाध्यक्ष माजलगाव, आष्टी, पाटोदा, इंद्रजित पांडूरंग बाभुळगांवकर जिल्हा उपाध्यक्ष बीड विधानसभा शिरूर तालुका, प्रदिप रामहारी जोगदंड जिल्हा उपाध्यक्ष बीड विधानसभा ग्रामीण, जगदीश हरिचंद्र उबाळे जिल्हा उपाध्यक्ष बीड विधानसभा शहर, संतोष नवनाथराव शिंदे शहराध्यक्ष बीड शहर पूर्व (पेठ बीड), उत्कर्ष संजय धपाटे शहराध्यक्ष बीड शहर पश्चिम, रितेश सुनिल अंधारे शहर उपाध्यक्ष बीड शहर पश्चिम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल शिवसेना मा. अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक आणि विपुल पिंगळे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांचा वाढदिवस ठिकठिकाणी उत्साहात साजरा

म्हसोबावाडी। प्रतिनिधी

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दै.लोकमत, मराठवाडा साथी वृत्तपत्रांचे तालुका प्रतिनिधी अविनाश कदम यांचा वाढदिवस सालाबाद प्रमाणे आष्टी शहरातील विविध ठिकाणी मित्रपरिवारानी मोठ्या उत्साहात साजरा केला.प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सोशल मीडियाद्वारे वाढदिवसाच्या शुभेच्छा देत दीर्घायुष्याची प्रार्थना करून तुमच्या लेखणीतून देव देश धर्माची सेवा घडो असे शुभेच्छा देताना म्हटले आहे.

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांचा वाढदिवस २१ ऑक्टोंबर रोजी सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला ते नेहमीच दरवर्षी वाढदिवसाच्या निमित्ताने अनाथ, निराधार, गोरगरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मिष्टान्न भोजनाची व्यवस्था करुन सामाजिक बांधिलकी जोपासत वाढदिवस साजरा करतात यावर्षी देखील पण सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवस साजरा केला वाढदिवसाच्या अगोदरच्या रात्री पासूनच शुभेच्छांचा वर्षाव होत होता सर्वात तडफदार निर्भिड निपक्ष पत्रकार म्हणून त्यांनी आपले एक वेगळेच स्थान निर्माण केले आहे.आपल्या लेखणीच्या माध्यमातून सर्व उपेक्षित घटकांवर निर्भीडपणे लिखाण करीत असल्यामुळे आष्टी तालुक्यात मोठ्या वाचक वर्गासह चाहत्यांनाही कमी नाही. पत्रकार क्षेत्रात मोठा दबदबा आहे.पत्रकार अविनाश कदम यांना तालुक्यातून अनेक गावातून मोठ्या प्रमाणात शुभेच्छांचा वर्षाव झाला. तसेच अनेकांनी वेगवेगळ्या शुभेच्छा प्रतिक्रिया देऊन आपल्या लेखणीतून यापुढे आष्टी तालुक्याला नव्हे तर महाराष्ट्रातील प्रत्येकाला न्याय भेटेल ही



अपेक्षा व्यक्त केली.त्यांच्यावर सर्व लहान–मोठ्यांनी राजकीय सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील सर्वांनीच समक्ष भेटून फोनव्दारे, एसएमएस, व्हाटस्अप फेसबुक, इंस्टाग्राम अशा वेगवेगळ्या सोशल मीडियाच्या माध्यमातून वाढदिवसाच्या आदल्या दिवशी पासूनच शुभेच्छांचा वर्षाव केल्यामुळे ते भारावून गेले होते. वाढदिवसाच्या शुभेच्छा माजी राज्यमंत्री सुरेश धस, राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख, जिल्हा परिषद सदस्य सतिश शिंदे, महाराष्ट्र केसरी सय्यद चाऊस,सिनेअभिनेते सुरेश विश्वकर्मा, ह भ प बबन महाराज बहिवाळ ,जेष्ठ नेते बापुसाहेब डोके, किशोर हंबर्डे,राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सचिव रेश्माताई जगताप,उपविभागीय अधिकारी वसीमा शेख, तहसीलदार वैशाली पाटील,नायब तहसीलदार बाळदत्त मोरे, नायब तहसीलदार अश्विनी पडोळे,सीडीओ ज्योती बेलेकर,तहसीलदार प्रमोद गायकवाड, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, तालुका आरोग्य अधिकारी राजेंद्र तांदळे , लोकमतचे संपादक नंदकिशोर पाटील,मराठवाडा साथीचे संपादक सतीश बियाणी, झुंजार नेताचे संपादक अजित वरपे, मराठी पत्रकार परिषदेचे मराठवाडा संघटक सुभाष चौरे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंखे, अनिल महाजन,संपादक विलास डोळसे, दत्तात्रय नरनाळे, युवा नेते सुनील रेडेकर, अनिल ढोबळे,भाजपचे तालुका उपाध्यक्ष रघुनाथ शिंदे,अक्षय भैय्या भोसले,शहराध्यक्षा बाबुराव कदम, सतिश बनकर,मांडवा गावचे उपसरपंच संतोष मुटकुळे, प्रशांत श्रीखंडे, धनेश मुटकुळे, काष्ठीचे युवा नेते पै अजय रधवे,पै.बटी रधवे,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षाचे प्रदेश युवक सचिव ॲड रिजवान शेख, अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष डॉ नदीम शेख, युवकचे जिल्हा कार्याध्यक्ष राहुल काकडे,नेते ऋषिकेश दरेकर,

शहराध्यक्ष जिशान सय्यद, दिपक उंबरकर, माजी सरपंच सय्यद शफी,युवा नेते अस्ताक शेख,जफर शेख,सहकार प्रतिष्ठानचे अतुल हराळ, गणेश पोकळे,संदिप हंबर्डे,राम योगे, निलेश सोनवणे, वैजिनाथ ढाळे, समीर पोकळे, नानासाहेब ढोरमाळे, संदिप अनारसे, माऊली गोरे, शिवप्रताप तवले, विशाल शेट्टी, अमोल इंगळे, विद्यासागर मंडले, विशाल चौधरी, महेंद्र वाल्हेकर, अमोल निकाळजे, महेंद्र वाल्हेकर, प्रशांत व्दारके,अमृत आजबे,माजी सरपंच विठ्ठल राख, शिक्षक बंडू राऊत, इंजिनिअर अमोल झांबरे, मोहम्मद शेख, तौफिक शेख, अरबाज कुरेशी,आयाज सय्यद, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, राजकीय सामाजिक, अधिकारी, कर्मचारी, पत्रकार,मित्र परिवार आदीं उपस्थित होते.

## व्यापारी महासंघ (कॅट) च्या मराठवाडा विभागीय अध्यक्षपदी हस्तीमल बंब

जालना । प्रतिनिधी

कन्फॅडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स (कॅट) अंतर्गत व्यापारी महासंघाच्या दोन दिवसीय भव्य राष्ट्रीय अधिवेशन नुकतेच दिल्ली येथे पार पडले. या अधिवेशनात सर्व राज्याचे जिल्हा स्तरीय कार्याचा आढावा देण्यात आले. राष्ट्रीय अध्यक्ष श्री बी. सी. भरतिया, राष्ट्रीय महामंत्री व चांदनी चौक दिल्ली येथुन नव निर्वाचित खासदार श्री प्रविणजी खंडेलवाल, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सचिनजी निवंगुणे यांनी जालना जिल्ह्याच्या कार्याचा अहवाल पाहून श्री हस्तीमलजी बंब यांची मराठवाडा

विभागीय अध्यक्ष पदी एका पत्रका द्वारे नियुक्ती केली आहे. पूर्वी व्यापारी संघटनाचा कार्य शहरा पुरते मर्यादित होते. श्री बंब यांनी जवाबदारी स्विकारल्या नंतर जालना जिल्ह्याचे सर्व तालुक्यात व ग्रामीण भागा पर्यंत अनेक बार दौरे, संपर्क करून गांवा–गावात व्यापार्यांची बैठका घेऊन एकजुट संघटीत करून प्रत्येक गावात शाखा उघडण्यात आली. जन माणसात संघटने प्रति आदर्श निर्माण करण्यासाठी गावाचा प्रवेश वर स्वागत फलक लावण्यात आले. व्यवसायात आर्थिक व्यवहार असल्यामुळे अधिकारी वर्गाचा, गुंडगर्दी प्रवृत्तीचे लोकांच्या त्रासामुळे संघटनेत काय ताकत असते ते दाखविण्यासाठी व्यापार्यांचे सुरक्षितेसाठी प्रत्येक प्रतिष्ठानाचे दर्शनीय भागात सभासद प्रमाणपत्र लावण्यात आले. व्यापार्यांची अडी–अडचण सोडविण्यासाठी प्रत्येक गावात विधीवत कार्यालय उघडण्यात आले. महागाई, सिमीत कुटूंब असल्यामुळे चुल–मुल पर्यंत न राहता सर्व क्षेत्रात महिला आघाडीवर आहे. पुरुष मंडळी मोठ्या प्रमाणावर व्यवसनाधिनताचा शिकार होत आहे, म्हणून उद्योग – व्यवसायात व्यापारी संघटनेत महिला आघाडीची स्थापना करण्यात आली. सभासदांना ओळखपत्र देण्यात आले. आपसात संपर्कासाठी जालना शहर सर्व तालुके, ग्रामीण विभागाची जनगणना करून जवळपास २० हजार व्यापार्यांच्या माहितीची दिशा निर्देशिका प्रकाशित करून वितरण करण्यात आले. व्यापार्याच्या सुरक्षतेसाठी, कुटूंबाच्या भविष्यासाठी विशेष करून ग्रामीण भागातील व्यापार्यांना प्रत्येकी १ लाख रुपयाचा अपघाती विमा निःशुल्क देण्यात आले. हे सर्व योजना देणारा फक्त महाराष्ट्रात नाही संपुर्ण देशात एकमेव जालना जिल्हा आहे. हे सर्व कार्य पाहून श्री बंब यांची मराठवाडा विभागीय अध्यक्ष पदी निवड करण्यात आली. मराठवाडातील सर्व जिल्ह्याचे संपर्क दौरे करून प्रत्येक जिल्ह्याच्या तळा–गळा पर्यंत व्यापार्यांची संघटना उभारून प्रत्येक व्यवसायिकांना संघटनेत समाविष्ट करु. देश चालविण्यासाठी देशाच्या जडण–घडणीत उद्योजक, व्यापार्यांचा फार मोठा योगदान आहे. अंतिम श्वासा पर्यंत समाजासाठी व्यापार्यांच्या हितात काम करीत राहीन असे बंब म्हणाले. व मराठवाडा विभागीय सचिवपदी श्री सुखदेव बजाज यांची निवड करण्यात आली. लवकरच मराठवाडा विभागीय कार्यकारिणीचे गठन करण्यात येईल. श्री बंब यांच्या निवडीसाठी श्री सतिष पंच, अंकुश राऊत, मो. कासीम बावला, प्रविण मोहता, अतुल लढ्ढा आदिंनी शुभेच्छा दिल्या. तसेच जिल्ह्यातुन सर्व स्तरावर श्री बंब यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पान ६ वरून...

### जरांगे पाटील यांचे

किशोर पिंगळे यांची २० वर्षापासून राजमुद्रा संघटनेकडून सामाजिक चळवळ सुरू

किशोर पिंगळे हे नाव आजच नव्हे तर गेल्या वीस वर्षापासून बीड जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यामध्ये ऐकायला मिळत आहे कुणाच्या मदतीला धावून जाणं असो कोणाच्या शैक्षणिक अडचणीचा प्रश्न असो कुणाला आर्थिक मदत असो कोणाला व्यवसायात सक्षम उभे करण्यासाठी उचललेलं पाऊल असो तर युवकांना निर्व्यसनी करण्यासाठी राबवलेले उपक्रम असो असे अनेक उपक्रम त्यांनी आपल्या राजमुद्रा सामाजिक संघटनेच्या माध्यमातून राबवत समाजामध्ये स्वतःची वेगळीच ओळख निर्माण केली आहे. सध्या संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे सर्वात विश्वासू म्हणून किशोर पिंगळे यांची ओळख असून त्यांना आमदार करण्यासाठी बीड विधानसभेतील १८ पगड जातीतील धर्मातील मायबाप जनता आप्पांच्या पाठीशी उभी राहील आणि आमदार करेल असा विश्वास आहे.

मराठा आंदोलनातील बीड जिल्ह्यातील महत्त्वाचे नाव किशोर पिंगळे

बीड जिल्ह्यामध्ये आतापर्यंत झालेले मराठा आरक्षणासाठी आंदोलन त्या प्रत्येक ठिकाणी किशोर पिंगळे यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. त्याचबरोबर संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेल्या आंदोलनात देखील पहिल्या दिवसापासून आज तगायत खंबीरपणे सावलीसारखं त्यांना सबंध जनतेने पाहिलं आहे. आज बीड विधानसभेत त्यांना आमदार म्हणून बघण्यासाठी बीडची जनता उत्सुक झाली आहे.

पान ६ वरून...

### महायुतीचे अधिकृत उमेदवार

जंगी सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले, उपजिल्हाप्रमुख गणेश सुपारकर, यांच्यासह अकोला निकळक, भराडखेडा ,कंडारी, रामखेडा बदनापूर येथील ग्रामस्थ, पदाधिकारी, शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### भास्कर दानवे यांचा

दर्शन घेतले तसेच घरून निघतांना त्यांचे औक्षण करण्यात आले. कुटुंबियांनी त्यांना विजयी होण्यासाठी आशीर्वाद दिले. अर्ज दाखल करताना यावेळी त्यांच्यासोबत अशोकआण्णा पांगारकर, सिद्धिविनायकजी मुळे, विमलताई आगलावे, विजयजी कामड हे देखील उपस्थित होते,. यावेळी माजी जि प सदस्य, प स सदस्य, नगरसेवक, सरपंच व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

### जालना विधानसभा निवडणूक

नामनिर्देशनपत्र दाखल करणार आहे. तुमच्या प्रतिस्पर्धी उमेदवारांनी विजयाचा दावा केल्याचे पत्रकारांनी निदर्शनास आणून दिले असता ते म्हणाले भास्कर दानवे यांनी सुद्धा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे ही लढत धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी होणार आहे. जितके जास्त उमेदवारी अर्ज दाखल होईल तितकी मोठी लीड मला राहील असे स्पष्ट करून विजयाची खात्री तर आपल्याला पहिल्या पासूनच आहे. कारण ज्या दिवशी मी आमदार झालो. फक्त काम केले, आणि ठोक काम केल्याचे जनतेला दाखवून दिले. पाण्याचे काम ठोक झाले, मेडिकल कॉलेजचे काम ठोक झाले, रस्ते, नाल्या आणि इतर विकासाची अशी किती तरी काम आपण मागील काळात केली असल्याचे आ. गोरंटयाल यांनी सांगितले. निवडणूक आली की, लोकांचं मन परिवर्तित होत नाही. लोक पाच वर्षातील तुमच्या कामाचा हिशोब घेऊन मतदान करत असतात असा टोला आ. गोरंटयाल यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्याला लगावला. तुम्ही साडे चार वर्ष काहीच करत नाहीत आणि सहा महिने इकडे तिकडे फिरतात त्यामुळे मतदानात अजिबात फरक पडत नाही. पाच वर्ष जनतेच्या सहवासात राहावं लागतं, त्यांच्या समस्या, अडचणी सोडवावा लागतात तेव्हा लोक मतदान करतात. तुम्ही केवळ नाटक करतात, ढोंग करतात त्याने मतदान होत नाही असा टोलाही आ. गोरंटयाल यांनी यावेळी मारला. महिलांची खातीच सांगतात, विजय कोणाचा होणार असे आपले प्रतिस्पर्धी उमेदवार म्हणाल्याचे गोरंटयाल यांच्या निदर्शनास आणून दिले असता ते म्हणाले काँग्रेस सरकारच्या काळात संजय गांधी निराधार योजनेसह अनेक योजना गोर गरीबांसाठी राबवल्या आहेत. ते मतदान आम्हाला मिळणार असून लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या बहिणी मतदान आम्हालाच करणार असल्याच्या प्रतिक्रिया बहुतांश बहिणींनी दिल्या आहेत असेही आ.कैलास गोरंटयाल यांनी शेवटी म्हंटले आहे.

### युवकांचे जल्लोषात

बुद्ध विहार वंदन करत हजारो नवयुवकांच्या उपस्थितीत निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय,तहसील माजलगाव येथे माजलगाव मतदार संघाच्या उमेदवारीचा अपक्ष अर्ज दाखल केला. यावेळी माजलगाव विधानसभा मतदारसंघातील हजारो नवतरुणांसह विविध जाती धर्मातील कार्यकर्ते बाबरी मुंडे यांच्या समवेत उपस्थित होते.

### मोहन अग्रवाल यांचा

बाळासाहेब अभोरे, तालुकाप्रमुख रंजीत कोल्हे, नितीन राठोड, अल्पसंख्याक अध्यक्ष खाजा शेख चांद,विलास राठोड राजाराम भांडवलकर. उपशहर प्रमुख कैलास पुरी, मधुकर निलेवाड,विभाग प्रमुख नागेश चिखली,विभाग प्रमुख प्रल्हाद शेळके ( सेवली सर्कल ) विभाग प्रमुख अतुल आर्दड. व शिवसेना पदाधिकारी परतूर मंठा नेर सेवली कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पाच विधानसभा मतदार

संघासाठी २ उमेदवारांनी ५ नामनिर्देशन अर्ज दाखल केले यात श्रीरंगराव रंगनाथराव जंजाळ (नॅशनालिस्ट काँग्रेस पार्टी–शरदचंद्र पवार) यांचा समावेश आहे. याप्रमाणे आज एकुण २६ नामनिर्देशन अर्ज दाखल केले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली. आजपर्यंत एकूण ३१२ इच्छुक उमेदवारांना ७५० नामनिर्देशन अर्जाचे वितरण करण्यात आले आहे. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र दाखल करुन घेतले. उमेदवारांना मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते ३ यावेळेत आपले नामनिर्देशन पत्र सादर करता येणार आहे. बुधवार, दि. ३० ऑक्टोबर, २०२४ रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येणार असून, सोमवार, दि. ४ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत उमेदवारांना आपले अर्ज मागे घेता येणार आहे. तर बुधवार, दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदान होणार आहे. या निवडणूकीचा निकाल शनिवार दि. २३ नोव्हेंबर, २०२४ रोजी जाहिर केला जाणार आहे.

**जालना शहर महानगरपालिका, जालना**
**प्रशासकीय इमारत, रेल्वे स्टेशन, जुना जालना –४३१२०३ कार्यालय संपर्क क्र.(०२४८२) २३०३५०**
Email Id:comcjalna@gmail.com
website-jalnamahaulb.maharashtra.gov.in
**जा.क्र./मनपा/पा.पु./२०२४/५२४ दि.९/१०/२०२४**

**दिपावली २०२२ व दिपावली २०२३ मध्ये विनंती केली !**
**आता विनंती नाही !!**
**अनाधिकृत नळ कनेक्शन धारकांवर गुन्हे दाखल होणार !!!**

कार्यपध्दतीः–

१. प्रत्यक्ष पाहणीमध्ये शहरातील सर्वच / बहुतांशी मालमत्ता धारकाकडे नळ कनेक्शन असल्याचे सिध्द.

२. मागील दोन वर्षाचा वेळ देवूनही मालमत्ता धारक नळ कनेक्शन नियमीत करत नाहीत आता कार्यवाही होणे अटळ.

३. सर्व अनाधिकृत नळ कनेक्शन नियमित होईपर्यंत जुन्या मालमत्तांना नविन नळ कनेक्शन देणे बंद राहील.

कार्यवाहीः–

ए) माहे नोव्हेंबर अखेर स्वतः हुन मागील दोन वर्षाच्या नळ पट्टीसह सर्व आकारणी भरुन नळ कनेक्शन अधिकृत करण्यासाठी तयार असल्याचे या कामाकरीता नियुक्त केलेल्या अभिकर्तामार्फत कळवावे.

बी) माहे डिसेंबर पासुन सर्वांवर नळ कनेक्शन बंद करुन पाणी चोरीचे व शासकीय मालमत्ता नुकसानीचे गुन्हे दाखल होतील.

सी) या करीता महानगरपालिकेने अनाधिकृत नळ कनेक्शनचा शोध घेवून त्यांना नियमीत करणे किंवा गुन्हा दाखल करीता साई एजन्सीज, जालना यांची अभिकर्ता म्हणुन नेमणूक केली आहे.

नियमित करण्याचा तपशील –

१. सालसन २०२२–२३ व २०२३–२४ या दोन वर्षाची–
रक्कम रु. ५,४००/– एवढी दंड म्हणुन
२. मालसन २०२४–२५ ची नियमीत पाणी पटटी–
रक्कम रु. २,७००/– एवढी दंड म्हणुन
३. रोड दुरुस्ती चार्जेस व इतर–
रक्कम रु. १,०००/– एवढी दंड म्हणुन
४. प्रशासकीय खर्च– रक्कम रु. ९००/– एवढी रक्कम असे एकुण– १०,०००/– (रु. दहा हजार) वरीलप्रमाणे पध्दतीचा अवलंब करुन सर्वांनी मुदतीत आपले नळ कनेक्शन नियमित करावे.

**स्वाक्षरित/–**
**आयुक्त तथा प्रशासक**
**जालना शहर महानगरपालिका, जालना**

# ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा बेळगाव जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीवर बहिष्कार

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी बेळगाव जिल्हा प्रशासनाकडून जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी (ता. २३) शेतकऱ्यांची बैठक बोलावण्यात आली होती. बैठकीला निर्णयक्षम अधिकारी उपस्थित नसल्याने शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त करून बैठकीवर बहिष्कार टाकला. त्यामुळे बैठकीत एकच गदारोळ माजला. शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या पवित्र्यामुळे पोलिस यंत्रणेचेही धावपळ उडाली.

लवकरच जिल्ह्यातील ऊस गाळप हंगामाला सुरुवात करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यासाठी बैठक बोलावली होती. बैठकीला निवासी जिल्हाधिकारी विजयकुमार होणकेरी, एसीपी सदाशिव कट्टीमनी यांच्यासह जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील शेतकरी संघटना प्रतिनिधी व शेतकरी उपस्थित होते. मात्र, या बैठकीला जिल्हाधिकारी मोहम्मद रोशन, साखर आयुक्त यांच्यासह साखर कारखान्याचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते. त्यामुळे निवासी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. जवळपास तासभर शेतकऱ्यांनी जिल्ह्यातील



साखर कारखान्यांकडून केली जाणारी काटामारी यावर प्रश्न उपस्थित केला.

काटामारी थांबविण्यात जिल्हा प्रशासन अपयशी ठरले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. तसेच जिल्ह्यातील अनेक साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांची उसाची बिले थकवली गेली आहेत. याबाबत जिल्हा प्रशासनाला अनेकवेळा निवेदन देऊनही कोणताच ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे जिल्हा प्रशासन अकार्यक्षम असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. जिल्हा प्रशासन व राजकीय नेते संगनमताने शेतकऱ्यांचे शोषण करत आहेत, असा आरोपही यावेळी झाला. केवळ कागदोपत्री नमूद करण्यासाठी शेतकऱ्यांची बैठक बोलावल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. निर्णय घेणारे अधिकारी बैठकीला नसतील, तर बैठक कशाला बोलावता, असा सवाल करून बैठकीत प्रश्नांचा भडीमार केला.

संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी साखर आयुक्त आणि सर्व साखर कारखान्यांचे व्यवस्थापकीय अधिकारी हजर नसल्यास बैठक पूर्ण होऊ देणार नाही. सर्व बैठकीला हजर राहिलेच पाहिजेत, तरच बैठक घ्या, अशी मागणी केली.

### 'साडेचार हजार दर द्या'

योग्य दर जाहीर केल्याशिवाय ऊस गाळप केला जाऊ नये. उसाला चार हजार पाचशे रुपये दर द्यावा, काटामारी थांबवावी, अशी मागणी लावून धरली. मात्र यावर प्रशासनाकडून कोणताच ठोस निर्णय घेण्यात आला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला.




### महत्वाच्या घटना

१७७४ : फिलाडेल्फिया येथे अमेरिकेतील पहिली महाद्विपीय काँग्रेस स्थगित झाली होती.
१८५८ : एच. इ. स्मिथ यांनी वाशिंग मशीन चा पेटेंट घेतलं.
१८६३ : जगातील सर्वात जुने फुटबॉल असोसिएशन लंडनमध्ये सुरु झाले.
१९०५ : नॉर्वे स्वीडनपासुन स्वतंत्र झाला.
१९३६ : हूवर धरणांवरील पहिले इलेक्ट्रिक जनरेटर पूर्णपणे सुरु झाले.
१९४७ : जम्मू आणि काश्मीरचे राज्य भारतात विलीन झाले.
१९५८ : पॅन अमेरिकन एअरवेज ची पहिले व्यावसायिक विमानसेवा सुरु झाली.
१९६२ : धी गोवा हिन्दू असोसिएशन निर्मित, वसंत कानेटकर लिखित व मास्टर दत्ताराम दिग्दर्शित 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकाचा पहिला प्रयोग मुंबई येथील भारतीय विद्याभवन येथे झाला.
१९७६ : त्रिनिदाद व टोबॅगो देशांना लंडन कडून स्वातंत्र्य मिळालं.
१९९४ : जॉर्डन आणि इस्त्राएल यांनी शांतता करारावर सह्या केल्या.
१९९९ : राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेतील संशोधक व्ही. व्ही. रानडे यांना केंद्र सरकारतर्फे 'स्वर्णजयंती फेलोशिप' जाहीर
२००६ : महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण प्रतिबंधक नियम अंमलात.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२७० : संत नामदेव (मृत्यू: ३ जुलै १३५०)
१८८१ : भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतिकारक, कायदेपंडित व राजकीय नेते बीरेंद्रनाथ ससमल यांचा जन्मदिन.
१८८६ : ओडिसा राज्यातील उल्लेखनीय समाजवादी व कवी पंडित गोदाबरीश मिश्रा यांचा जन्मदिन.
१८८८ : प्रसिद्ध बंगाली लेखक व साहित्यक समीक्षक मोहितलाल मजुमदार यांचा जन्मदिन.
१८९० : भारतीय पत्रकार आणि राजकारणी गणेश शंकर विद्यार्थी यांचा जन्म. (मृत्यू: २५ मार्च १९३१)
१८९१ : वैकुंठ मेहता सहकारी चळवळीचे प्रवर्तक (मृत्यू: २७ आक्टोबर १९६४)
१९०० : इझ्रा मीर माहितीपट निर्मितीचे आद्य प्रवर्तक (मृत्यू: ७ मार्च १९९३)
१९१६ : फ्रान्सवाँ मित्राँ फ्रान्सचे २१ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ८ जानेवारी १९९६)
१९१९ : मोहम्मद रझा पेहलवी शाह ऑफ इराण (मृत्यू: २७ जुलै १९८०)
१९२४ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय स्त्रीवादी सामाजिक कार्यकर्ता व गांधीवादी शोभना रानडे यांचा जन्मदिन.
१९३७ : हृदयनाथ मंगेशकर संगीतकार व गायक
१९४७ : हिलरी क्लिंटन अमेरिकेच्या ६७ व्या परराष्ट्रमंत्री
१९५४ : नाट्य आणि चित्रपट अभिनेते लाक्शीकांत बेर्डे यांचा जन्म. (मृत्यू: १६ डिसेंबर २००४)
१९७४ : रवीना टंडन अभिनेत्री

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०९ : इटो हिरोबुमी जपानचे पहिले पंतप्रधान (जन्म: १६ आक्टोबर १८४१)
१९३० : डॉ. वाल्डेमर हाफकिन प्लेग व कॉलरा प्रतिबंधक लशीचा शोध लावणारे सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ (जन्म: १५ मार्च १८६०)
१९४७ : ब्रिटीश कालीन भारतातील बंगाल प्रांताचे गव्हर्नर लॉर्ड लिटन द्वितीय यांचे निधन.
१९५५ : हिंदुस्थानी शास्त्रीय गायक पंडित दत्तात्रेय विष्णू पलुस्कर यांचे निधन.
१९७९ : चंदूलाल नगीनदास वकील अर्थशास्त्रज्ञ, देशातील पहिल्या अर्थशास्त्र विभागाची त्यांनी मुंबई विद्यापीठात सुरुवात केली. (जन्म:)
१९८१ : भारतीय पद्मश्री व ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय कन्नड भाषिक कवी दत्तात्रेय रामचंद्र बेंद्रे यांचे निधन.
१९९१ : अनंत काशिनाथ भालेराव स्वातंत्र्यसैनिक, लेखक, दैनिक 'मराठवाडा' चे संपादक, हैदराबाद मुक्तीसंग्राम व संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहभाग (जन्म: १४ नोव्हेंबर १९१९)
२००० : भारतीय स्वतंत्रता संग्रामातील प्रमुख क्रांतिकारक व सिद्धहस्त लेखक तसचं, हिंदी, इंग्रजी व बांग्ला बाषिक आत्मकथाकारसाहित्यिक मन्मथनाथ गुप्ता यांचे निधन.

## द्राक्ष पिकात घडकुज आणि डाऊनी मिल्ड्यूचे व्यवस्थापन!



अनेक द्राक्ष बागांमध्ये छाटणीनंतर प्री-ब्लूम अवस्थेत सध्या घड कुजणे आणि डाउनीची समस्या दिसून येते. यामुळे द्राक्ष बागेचे नुकसान होते. जाणून घेऊ या द्राक्ष पिकातील घड कुजणे आणि डाउनी मिल्ड्यू रोगाची कारणे आणि त्यासाठी करावयाचे उपाय.

द्राक्षातील घड कुजणे आणि डाउनी मिल्ड्यू समस्येची कारणे : फळछाटनीनंतर बागेत वेलीच्या प्रत्येक काडीवर साधारण चार ते पाच डोळ्यांवर हायड्रोजन सायनामाइडचे पेस्टिंग करतो. इथेफॉनच्या वापरामुळे डोळे चांगले फुगलेले असतात. त्यामुळे सर्वच डोळे फुटून निघतात. यानंतर घड पाच पानांच्या अवस्थेत स्पष्टपणे दिसून येतो. ही अवस्था फळछाटणी नंतर साधारणपणे चौदाव्या दिवसानंतर दिसून येते. या कालावधीत फेलफुटी काढण्याला प्राधान्य दिले जाते. वाढीच्या या अवस्थेत पाऊस जास्त प्रमाणात झालेला असल्यास बागेत अचानक आर्द्रता वाढते. प्री-ब्लूम घड अवस्थेत पाऊस झाल्यास या छोट्याश्या कॅनॉपीमध्ये आर्द्रता वाढू शकते. दोन ओळींमध्ये असलेली मुळे पाऊस झाल्यामुळे कार्यरत होतात. मुळांद्वारे ऑक्सीन्सची उत्पत्ती जास्त होत असल्यामुळे वेलीमध्ये अंतर्गत जिबरेलीन तितक्याच प्रमाणात वाढू लागते. परिणामी, पानांची लवचिकता वाढून वेल अशक्त होतात. प्री-ब्लूम किंवा दोडा अवस्थेत असलेल्या घडांवर पाण्याचे थेंब साचून राहिल्यास कुजेला बळी पडतात. बऱ्याचदा रात्री झालेल्या पावसानंतर सकाळी बागेत संपूर्ण घड कुजलेले दिसू शकतात. बऱ्याच बागेत पावसाळी वातावरणात गवतही जास्त वाढते. पाऊस झाल्यानंतर या गवतामुळे जमिनीवरील भागात आर्द्रता जास्त काळ टिकून राहते. ओलांडा ते जमीन हे अंतर कमी असते. ढगाळ वातावरणात हवाही खेळती राहत नाहीत. या दोन्ही गोष्टींमुळे आर्द्रता अधिकच वाढते. हे डाऊनी मिल्डचुच्या प्रादुर्भावासाठी पोषक ठरते. ही परिस्थिती दाट कॅनॉपी असलेल्या ठिकाणी हमखास दिसून येते. कुज आणि डाऊनी समस्येसाठी उपाययोजना : कुज आणि डाऊनीचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी कॅनॉपीवर लक्ष देणे आवश्यक आहे. यावर पुढील उपाययोजना महत्त्वाच्या ठरतील. घड स्पष्टपणे दिसताच फेलफुटी त्वरित काढून घ्या. वेलीवर झिंक आणि बोरॉन प्रत्येकी ०.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी फवारणी करून घ्यावी. पालाश (०-०-५०) १ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करून घ्यावी, यामुळे वेल सशक्त होण्यास मदत होईल. एखादे सायटोकायनीनयुक्त संजीवक कमी प्रमाणात फवारून घ्यावे. पाऊस जास्त झालेल्या परिस्थितीत ओलांडा किंवा खोडावर चाकूने जखम करावी. त्यामुळे सायटोकायनीनची पातळी वाढण्यास मदत होते.

## जिवामृत देण्याची पद्धत आणि फवारणीचा परिणाम

जिवामृत हे खत नसून अनंत कोटी उपयुक्त सुक्ष्म जिवाणूंचे सर्वोत्तम विरजन आहे.तसेच सर्वोत्तम बुरशिनाशक सर्वोत्तम विषाणू नाशक तूरोधक व सर्वोत्तम संजिवक आहे.

जिवामृत कसे तयार करावे?


२०० ली. पाणी त्यात १० की. देशी गाईचेच शेण (जर्सी चे अजिबात नाही)५ ते १० ली. देशी गाईचेच गोमुत्र ( जर्सी प्राण्याचे अजिबात चालणार नाही )१ की. काळा गुळ ( केमिकल नसलेला)किंवा ४ ली.ऊसाचा रस किंवा १० की.ऊसाचे तुकडे,किंवा १० की.गोड ज्वारीचे तुकडे, किंवा १ की.गोड फळाचा गर आणी१ किलो बेसन व १ मुठ बांधावरची जिवानु माती.हे सर्व बॅरेल मध्ये टाकून चांगले ढवळुन पोते झाकून ठेवावे,सकाळ संध्याकाळ १ मिनिट काठीने ढवळावे .सूर्यप्रकाश व पावसाचे पाणी बॅरेलमध्ये पडू नये. ४८ तासा नंतर जिवामृत वापराला तयार होते जास्तीत जास्त ७ दिवसापर्यंत वापरता येते. ७ दिवसानंतर सडण्याची क्रिया चालू होते.

जिवामृत कसे द्यावे?

सिंचनाच्या पाण्यातून देणे, सरळ जमिनीवर टाकणे, उभ्या पिकावर फवारणी करणे, अशा तिन्ही प्रकारे सर्वोत्तम परिणाम दिसतो. जिवामृताच्या फवारणीचा परिणाम : कोणत्याही झाडांची हीरवी पाने दीवसा अन्न निर्मिती करतात. या प्रक्रीयेला प्रकाशसंश्लेषन क्रिया म्हणतात. एक चौ.फुट हीरवे पान एका दिवसात सुर्यप्रकाशामधुन १२.५ . कॅलरी सुर्य ऊर्जा पानामध्ये जमा करतात व हवेतून कर्बाम्ल वायु घेऊन (कार्बन डाय ऑक्साईड) व जमिनीतून पाणी घेउन १ चौ.फुट पान एका दीवसाला ४.५ ग्रॅम अन्न निर्मिती करते व त्यापासून आपल्याला १.५ ग्रॅम अन्नधान्याचे उत्पादन मिळते , २.५ ग्रॅम फळांचे व उसाचे टनेज मिळते. याचा अर्थ जर आपन पानाचे आकारमान दुप्पट केले तर उत्पादन दुप्पट होईल. पानाचे आकारमान वाढवणारे काही संजिवके असतात ते जिवामृता मध्ये असतातच म्हणून जिवामृत फवारले कि पानाचा आकार वाढतो. पिकांच्या पानावर सतत रोग निर्माण करणाऱ्या बुरशिंचा व जंतूंचा हल्ला होत असतो. जिवामृत हे अत्यंत उपयुक्त बुरशिनाशक व जंतूरोधक आहे म्हणून जिवामृत फवारल्यावर पिकावर रोग येत नाही. पिकावर किडींचा हल्ला सतत होत असतो व जर पानामध्ये प्रतिकारशक्ती नसेल तर पाने किडींना बळी पडतात. जिवामृतामध्ये पानांना प्रतिकारशक्ती देनारे काही असतात त्यामुळे जिवामृत फवारनीने पानामध्ये प्रतिकारशक्ती निर्माण होते व पिक किडीपासून वाचतात. आणीबाणीत जर मुळ्याच्या माध्यमातून पानांना नत्र मिळाला नाही तर पानांची वाढ थांबते परंतु काही जिवानू असे आहेत कि जे पानावर बसून थेट हवेतून नत्र घेतात व पानांना पुरवतात. सुर्यप्रकाशा सोबत अतीनील किरनां सारखे अत्यंत घातक विविध किरनं येत असतात ते किरनं पानावर पडले किंवा झाडांमधील अनुवंशिक गुणधर्मांमध्ये बदल होतो व झाडामध्ये विकृती निर्माण होते .जिवामृताचे फवारनी या विविध किरणांपासून सहनशीलता देते.



## जाणून घ्या अगरवूड झाडाचे फायदे



आगरवूड हे एक प्रकारचे वृक्ष असून जगातील सर्वात महागड्या लाकडा पैकी एक आहे. या लाकडाचा उपयोग विविध प्रकारचे परफ्यूम बनविण्यासाठी तसेच अगरबत्ती व इतर सुगंधी वस्तू तयार करण्यास उपयोग केला जातो. आगरवुड हे झाड वन कायदा १९२७ या कायद्यानुसार भारतातील वृक्षाची एक अत्यंत दुर्मिळ प्रजाती आहे. आधुनिक युगात विविध प्रकारचे कृत्रिम सुगंध देणारे उत्पादने बनवली जात आहेत. परंतू कृत्रिम साहित्याचा वापर करून बनवण्यात येणाऱ्या उत्पादनाचा सुगंधी दर्जा क्षणिक असून मानवी शरीरास धोकादायक ठरतो आहे. त्याचबरोबर पर्यावरणास नुकसान ठरत असल्याने आगरवूड या झाडास अधिक महत्व प्राप्त झाले आहे.

या झाडापासून अनेक सुगंधी वस्तू बनविण्यासाठी सर्वाधिक वापर केला जातो ज्यात अगरबत्ती, धूप गोळ्या, तेल ,संधिवात तेल, परफ्यूम बनवणाऱ्या कंपन्या याचा वापर करत आहेत. या झाडाचा उपयोग चायना लोकांनी भरपूर प्रमाणात केला आहे. चीन मधील पुरुषांकडून याचा उपयोग शामक आणि कामोत्तेजक म्हणून केला जातो.

आगरवूड लागवड करणारे राज्य : आगरवूड या झाडाचे उगमस्थान ईशान्येकडील राज्यात किंवा हिमालयीन प्रदेशात मानले जाते. तर त्रिपुरा राज्यात या झाडास राज्य वृक्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे. या वृक्षाला अनेक नावाने ओळखले जाते १) कृष्णागरू २) दहागरू ३) काष्टागरू ४) स्वादगरू असे अनेक उप नाव आहेत. त्रिपुरा, आसाम, मेघालय, मणिपूर, हिमालयीन प्रदेश या पाच ठिकाणी आगरवूड झाडाची लागवड केली जाते. उत्पादन कमी व मागणी वाढल्याने झाडाच्या किमतीतही मोठी वाढ झाली असून याचे उत्पादन बऱ्याच राज्यात समुद्र किनारपट्टी लगत चांगले मिळू लागले आहे. ज्यात महाराष्ट्र, गुजरात, केरळ, कर्नाटक, अशा अनेक राज्यात उत्पादन वाढविण्यात भर देण्यात येऊ लागला आहे.

अगरवुडचा उपयोग : आरोग्यसंबंधित उपयोग - अगरवुडच्या तेलाचा उपयोग धूप, स्नानक्रीम, आणि मालिश तैयार करण्यात केला जातो, ज्यामुळे त्वचा केवळ साफ असते, तरी ती काही रोगांवर परिणामीपणे फायद्याची असू शकते. आर्थिक उपयोग - अगरवुड एकमेव लाकडी मूळ आहे ज्यामुळे त्याचा उत्पादन आणि विपणन करण्यामागे उत्तम मार्ग असू शकतो. त्यामुळे त्याचा व्यापारिक उपयोग अत्यंत महत्त्वाचा आहे. आध्यात्मिक उपयोग - काही संस्कृतीत अगरवुडला आध्यात्मिक महत्त्व दिला जातो. त्यामध्ये मनातील स्वप्न पूर्ण करण्यासाठी, चिंतांच्या परिहारासाठी, आणि मेधांच्या वृद्धीसाठी तो वापरला जातो. सौंदर्यशास्त्रिक उपयोग - अगरवुड त्याच्या गंधी स्वभावामुळे सौंदर्य उत्पादनात वापरला जातो, जसे की इत्र, धूप, आणि स्नान उत्पादन. चिकित्साशास्त्रीय उपयोग - अगरवुडच्या गंधाची चिकित्साशास्त्रीय गुणधर्म काही आज्ञांकित करतात, जसे की स्त्रीरोग, माइग्रेन, व्यसनमुक्ती, करण्यास उपयोगी ठरते.

आगरवूड लाकडाची किंमत : अगरवुडच्या विविध सुगंधी झाडाचे जागतिक पातळीवर वेगळे स्थान निर्माण झाले आहे.तिची शाखा, खोड आणि मुळांची उत्पत्ती, कालावधी आणि कापणी आणि प्रक्रिया करण्याच्या पद्धतींवर प्रभाव पडतो. चंदन, गुलाबी हस्तिदंत आणि आगरवूड जगातील सर्वात महागड्या लाकडांपैकी एक मानले जाते. दर्जेदार सुगंध वर्धक असलेले हे झाड जगातील सर्वात महाग नैसर्गिक कच्च्या मालांपैकी एक आहे.

आगरवूड झाडाची किंमत आंतरराष्ट्रीय बाजार पेठेत ७० ते ७५ लाख रुपयांपर्यंत सांगण्यात येते. एवढ्या मोठ्या किमतीत असूनही लाकडाचे उत्पादन कमी आहे. गुणवत्तेची आणि उत्पादनांची विस्तृत श्रेणी बाजारपेठेत भाव वाढवण्यास कारणीभूत ठरते. भौगोलिक स्थान, वनस्पतिजन्य प्रजाती, विशिष्ट झाडाचे वय, सांस्कृतिक निक्षेप आणि आगरवुडचा तुकडा ज्या झाडापासून निघतो त्या झाडाची किंमत ठरवते. शेतकऱ्यांनी व्यापारी दृष्ट्या याकडे बघण्याची गरज आहे.

# समाज जागृतीतून होते राष्ट्राची सुधारणा-डॉ.उदय निरगुडकर

## साहित्य निकेतन ग्रंथालयाचा उपक्रम ; उध्दवराव आपेगांवकर यांच्या पखवाज वादनाने श्रोते मंत्रमुग्ध

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आज समाजात संघ भावना राहिली नाही, अशी खंत व्यक्त करून डॉ.निरगुडकर यांनी प्रत्येकजन माझे कुटूंब व त्याचा वैयक्तिक विकास या गोष्टीवरच लक्ष केंद्रीत करतो आहे. त्याचा परिणाम सांघिक भावना ढासळली आहे. आज समष्टी विकासाऐवजी वैयक्तिक विकासाकडेच वाटचाल सुरू आहे, हे चित्र बदलले गेले पाहिजे, संघ भावना वाढीस लागावी यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न झाले पाहिजेत अशी अपेक्षा व्यक्त करून समाज जागृतीतून होते राष्ट्राची सुधारणा असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार डॉ.उदय निरगुडकर यांनी केले. ते अंबाजोगाईत बोलत होते.

शहरातील साहित्य निकेतन ग्रंथालय, अंबाजोगाई यांच्या वतीने प्रसिद्ध पत्रकार तथा अभ्यासू वक्ते उदय निरगुडकर यांच्या व्याख्यानाचे व जागतिक किर्तीचे पखवाज वादक उध्दवराव बापू आपेगांवकर यांच्या मंगलमय पखवाज वादनाचे आयोजन मंगळवार, दिनांक २२ ऑक्टोबर रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खोलेश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह किरण कोदरकर तर व्यासपीठावर साहित्य निकेतन ग्रंथालयाचे कार्यवाह शंतनू हिरळकर हे होते. प्रारंभी दीपप्रज्ज्वलन आणि भारतमातेच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ऍड.मकरंद पत्की, शंतनू हिरळकर, अमोल जड व अक्षय खडके यांनी केले. सुरूवातीला पं.उध्दवराव बापू आपेगांवकर यांनी पखावज वादनाचा इतिहास, महत्त्व विशद केले. पखावज वादन क्षेत्रात आपण दादागुरू मख्खनजी भैय्या, पद्मश्री शंकरराव आपेगांवकर यांची परंपरा पुढे चालवत आहोत हे सांगून त्यांनी परण, पदन्यास, निकास, चाल, नाद, गजर, शब्दांचे वजन आणि लयकारी याबाबत माहिती देत. सुश्राव्य पखावज वादनाने उपस्थित रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर शंतनू हिरळकर यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षीय समारोप किरण कोदरकर यांनी केला. यावेळी 'विकसित भारतासाठी महाराष्ट्राचे योगदान' या विषयावर बोलताना डॉ.निरगुडकर म्हणाले की, पुढील पाच वर्षांत विकास दर व नाविन्यतेची गती कायम ठेवली तर विकसित भारत व्हायला आणि ते आपण प्रत्यक्ष पाहायला वेळ लागणार नाही, आताचा भारत बदलला आहे. २०४७ मध्ये हाच भारत अधिक सामर्थ्यवान राहील, नीती, गती, दिशा हे केंद्रबिंदू मानून विद्यमान केंद्र सरकारने देशवासियांचा विश्वास संपादन केला आहे. पारंपरिक उद्योगाला नाविन्यतेची जोड देणे गरजेचे आणि त्यासाठी संघटितपणे प्रयत्न व्हायला हवेत, धैर्यवान अन्? बलशाली समाजच बलवान राष्ट्र निर्मितीस कारणीभूत ठरणार आहे. त्यांनी सद्य:स्थितीवर अत्यंत परखडपणे मते व्यक्त केली. यथा राजा तथा प्रजा हे सूत्र आता राहिलेले नाही, तर यथा प्रजा तथा राजा हे लोकशाहीचे वैशिष्ट्य ठरले आहे, असे ते म्हणाले. समाज व्यवस्थेत स्वतःवरच्या जबाबदार्या पध्दतशीरपणे झटकण्याचे काम प्रत्येकामार्फत दिवसेंदिवस सुरू आहे. ते एवढे की, राज्य व देश चालविण्याकरीता सुध्दा ठेकेदारी दिल्याचा आव समाज आणतो आहे. त्यातून स्वतःची जबाबदारी समाज पध्दतशीरपणे टाळतो आहे. समाजाचे हे वर्तन पूर्णतः चुकीचे आहे. समाज दिवसेंदिवस अलिप्तवादी भूमिका घेतो आहे. त्यातून अनेक प्रश्न उद्भवत आहेत, चिघळत आहेत. समाजाने अलिप्तवादीपणाचे धोरण सोडले पाहिजे, सक्रियता वाढवली पाहिजे, समाजाभिमुख विषयांमध्ये लक्ष केंद्रीत केले पाहिजे, वेळप्रसंगी रोखठोक भूमिका घेतल्या पाहिजेत, जाब विचारला पाहिजे, तरच सुधारणेकडे आपण वाटचाल करू, आमूलाग्र असा बदल करू, असा विश्वास व्यक्त करतेवेळी डॉ.निरगुडकर यांनी आज समाजात संघ भावना राहिली नाही, अशी खंत व्यक्त केली. प्रत्येकजण माझे कुटूंब व त्याचा वैयक्तिक विकास या गोष्टीवरच लक्ष केंद्रीत करतो आहे. त्याचा परिणाम सांघिक भावना ढासळली आहे. आज समष्टी विकासाऐवजी वैयक्तिक विकासाकडेच वाटचाल सुरू आहे, हे चित्र बदलले पाहिजे, संघ भावना वाढीस लागावी यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न झाले पाहिजेत, अशी अपेक्षाही व्यक्त केली. विकसित राष्ट्राची संकल्पना विकसित समाजाशिवाय कदापिही शक्य नाही, सत्तेतून विकास होण्यापेक्षापेक्षा समाज जागृतीतून राष्ट्राची सुधारणा हीच शाश्वत सुधारणा आहे. जपान, जर्मनी, इंग्लंड आदी देश याचे उत्तम उदाहरण आहे, असे ते म्हणाले. देशावर सत्ता कोणाची यापेक्षा त्या देशातील नागरीक किती उद्यमशील व राष्ट्रभक्त आहेत, यावर त्या देशाची उन्नती ठरते, नागरीकांच्या प्रत्येक कृतीतून राष्ट्रहीताची भावना जोपासली जाणे त्यासाठी महत्वाचे ठरते, असे नमूद करतेवेळी भारतासोबत स्वतंत्र झालेल्या इतर राष्ट्रांच्या तूलनेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे देशातील लोकशाही व्यवस्था सुरूवातीपासूनच प्रगल्भ राहिली. त्या लोकशाही व्यवस्थेमुळेच नजीकच्या काळात देशाची विकसित राष्ट्राकडील वाटचाल वेगाने व दमदारपणे होत आहे, हे मान्य करावेच लागेल, असेही ते म्हणाले. राष्ट्रीय शिक्षण धोरणात इतिहासकालीन अनेक गोष्टी तथ्यांशाने न शिकविता विपरित इतिहास शिकविला गेला. त्यामुळे देशाला मिळालेले स्वातंत्र्य हे थोर स्वातंत्र्यसैनिकांच्या दूरदृष्टीचा परिणाम आहे. व ते मिळालेले स्वातंत्र्य जोरकसपणे राखून जागतिक व्यापारामध्ये भारताचे स्थान पुन्हा वाढविण्याची जबाबदारी येणार्या पिढीवर आहे, स्वातंत्र्यानंतर आपल्या प्रगतीची दिशा व केंद्रबिंदू चुकले, त्याचे परिणाम ३ पिढ्यांनी भोगले असेही ते म्हणाले. आपल्या भाषणातून डॉ.निरगुडकर यांनी लोकाभिमुख आणि विकासाभिमुख भूमिका, देशातच वेगवेगळ्या क्षेत्रात अत्यंत प्रामाणिकपणे, जिद्दीने, चिकाटीने संशोधनासह सर्व क्षेत्रात आपल्या महाराष्ट्रातील तरूण अभियंते, डॉक्टर व संशोधक हे दुरगामी विकास कामात योगदान देत आहेत याबाबत समाधान व्यक्त केले. गतवैभव मिळवण्यासाठी प्रत्येकाला पुढाकार घ्यावा लागेल, शंभर टक्के मतदान करा, फुकट काहीही देवू नये, आपल्याला रेवडीबाज कल्चर नकोय तर आंतरराष्ट्रीय प्रतिमा असलेले नेतृत्व हवे आहे. देशाचा अभिमान वाटेल असे तथ्य व सत्य आपल्यापर्यंत पोहचू दिले जात नाही. फेक नरेटिव्ह पसरवला जातोय, सोशल मीडिया, विचारवंत आणि कलावंत यांना हाताशी धरून समाजातील युवकांना आणि कर्तृत्ववान लोकांना गुमराह केले जात आहे. नुकतेच श्रीलंका व बांग्लादेशात हेच घडले आहे. त्यामुळे एक देश व एक समाज म्हणून आपण एक झाले पाहिजे असे आवाहन डॉ.निरगुडकर यांनी केले. यावेळी दत्तप्रसाद गोस्वामी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तर कौस्तुभ कोदरकर यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. तर प्रा.सागर कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता प्रख्यात गायक जयेंद्र कुलकर्णी यांनी सादर केलेल्या पसायदानाने झाली. या कार्यक्रमास अंबाजोगाई शहर व परिसरातील शिक्षण, सामाजिक, सांस्कृतिक, वैद्यकीय, साहित्य, पत्रकारिता, क्रीडा, सहकार, संगीत, उद्योजक, व्यापार क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी साहित्य निकेतन ग्रंथालयाच्या वतीने पुढाकार घेण्यात आला



## विद्यार्थ्यांचे आई-वडिलांसी मैत्रीपूर्ण नातं असावं - डॉ.सुभादा लोहीया

### मुलींनी निर्भीड बनावं- पंडित चव्हाण




अंबाजोगाई । प्रतिनिधी

संकल्प विद्या मंदिर शाळेमध्ये विविध उपक्रम राबवले जातात याच उपक्रमाचा भाग म्हणून कुमारवयीन मुलांसाठी संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी आदर्श शिक्षक पंडित चव्हाण हे होते तर प्रमुख मार्गदर्शिका डॉ.शुभदा लोहिया मॅडम ,संस्थेचे कार्याध्यक्ष श्री कैलास चोले सर यांची उपस्थिती होती.

डॉ.शुभदा लोहिया मॅडम यांनी कुमारवयीन लैंगिक अत्याचार,कौटुंबिक वातावरण,समाजामध्ये कसे वापरावे,मुला- मुलींमध्ये शारीरिक होणारे बदल , मुला-मुली मध्ये मैत्रीपूर्ण वातावरण कसे असावे,स्त्री - पुरुष समानता अशा विविध विषयाला हात घालून अगदी विद्यार्थ्यांच्या हृदयाला भिडणारे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना बदलण्याच्या आव्हान केले. तसेच अध्यक्षीय समारोप करत असताना श्री पंडित चव्हाण सर यांनी विद्यार्थ्यांनी भाषा विषयशी मैत्री करा. मुलींनी निर्भीड राहायला हवं, स्वतःचे संरक्षण स्वतः करा असा मार्मिक सल्लाही दिला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती बडे आर.एस.यांनी केले तर सूत्रसंचालन श्रीमती अनिता कुलकर्णी मॅडम,आभार श्रीमती कौशल्य शिंदे मॅडम यांनी मानले .कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरम नी करण्यात आली.

## माजलगाव शहरात जिल्हा वाहतुक शाखेची कारवाई

### कागदपत्रे नसल्याने १० वाहने पोलीस ठाण्यात

बीड । प्रतिनिधी

माजलगाव शहरात, बुधवारी (दि.२३) ५० रिक्षा व २५ मोटरसायकल ,अशा ७५ वाहनावर कारवाई केली.यातील दहा रिक्शा चालकांनी कागदपत्र हजर न केल्याने ही दहा वाहणे पोलीस ठाण्यात लावण्यात आली.माजलगाव शहरात, ४० ते ५० प्रवासी रिक्षा व २५ मोटरसायकल यांच्यावर जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने, कारवाई करण्यात आली. विना कागदपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स, इन्शुरन्स,नसलेली वाहणे. गाड्यावर काका, मामा अशी उपाधी लावलेली वाहणे. या सदराखाली तपासणी करून ७० ते ८० हजार रुपये दंड आकारण्यात आला.




ही कारवाई पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या बहुमूल्य मार्गदर्शनाखाली माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सूर्यतळ, जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी सुभाष सानप यांच्या अधिपत्याखाली,पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर,पो.ह. उबाळे, शिंदे, नागरगोजे पो. ना. मुंडे चालक हवलदार हरके माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस.हवालदार पाखरे, अमलदार कानडे हे सर्व कारवाई मध्ये सामील होते.

## पाटोद्यातील शेकडो मुस्लिम युवकांचा भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली प्रवेश




पाटोदा । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत पाटोदा तालुक्यात राजकीय भूकंप झाला आसुन पाटोदा तालुक्यातील युवानेते सय्यद रिजवान (बिल्डर), शेख जमील, शेख जाऊभैय्या,चाऊस महम्मद यांच्यासह त्यांच्या शेकडो समर्थकांनी माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली प्रवेश केला.लक्ष्मी लॉन ता.आष्टी येथे आयोजित केलेल्या आष्टी,पाटोदा,शिरुर मतदारसंघातील अल्पसंख्यांक (मुस्लिम) बांधव यांच्या संवाद मेळाव्यात उपस्थित बांधवांना आमदार धोंडे यांनी संबोधित केले.यावेळी भाजपा युवा मोर्चा बीड जिल्हा सरचिटणीस डॉ.अजय दादा धोंडे, कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी शिक्षण सभापती नियामत बेग साहेब,भाजपा आष्टी तालुका अध्यक्ष अॅड.साहेबराव म्हस्के, आरपीआयचे आष्टी तालुका अध्यक्ष अशोक साळवे,पांडुरंग नागरगोजे, बाळासाहेब पवार,नवनाथ सानप, किशोर खोले, अँड सय्यद, सभापती लाबरुडताई, देवीदास शेंडगे, यांच्या सह जि.प. सदस्य, पं.स. सदस्य, नगरसेवक, सरपंच, ग्रा.प.सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते पत्रकार बांधव व अल्पसंख्याक (मुस्लिम) बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

## रुद्रा राजू यांच्याकडून महायुती सरकारच्या भ्रष्टाचाराची चिरफाड

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे कार्यालय काँग्रेस भवन येथे तालुका काँग्रेसच्या वतीने जिल्ह्याचे निरीक्षक तथा अखिल भारतीय काँग्रेस केंद्रीय कार्यकारणी सदस्य श्री रुद्रा राजू यांच्या उपस्तिथीत पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी महायुती सरकारच्या भ्रष्टाचाराचा आलेख त्यांनी सादर करत ''गद्दारांचा पंचनामा '' या पत्रकाचे प्रकाशन करत पत्रकार परिषदेत महायुती सरकारच्या भ्रस्टाचाराची चिरफाड करत सविस्तर आलेख मांडला. यावेळी बोलत असताना राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हा निरीक्षक तथा अखिल भारतीय काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य श्री रुद्रा राजू यांनी सांगितले, कि दैनंदिन जीवनात सर्वसामान्य लोकांना अत्यावशक असणाऱ्या जीवनावशयक वस्तूंच्या दरात प्रचंड वाढ करून, सर्वसामान्यांचे जिवन विस्कळीत करण्याचे महापाप भाजपा आणि महायुती सरकारने केले आहे. तसेच युवावकांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून देणारे प्रकल्प राज्यातून परराज्यात घालवली असून, बेरोजगारांची घोर निराशा केली असून, मुली आणि महिलांवरील वाढत्या अत्याचारला आळा घालण्यास महायुतीचे भ्रष्ट सरकार सपसेल निकामी ठरले असून, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोकण्यास ही अपयशी ठरले आहे. तसेच शेतकऱ्यांना शेती विषयक आवश्यक साधन आणि खते, औषधे यांच्यावर प्रचंड जि. एस. टी लादून शेतकऱ्यांचे जगणं मुश्किल केलं आहे.याच्यामुळे विद्यार्थी, शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार, महिला सुरक्षा, सामाजिक आणि आर्थिक समानता आबादित राहण्यासाठी भाजपाला राज्यातून हद्दपार करणे हा एकमेव उद्देश ठेऊन काँग्रेस महावीकास आघाडीच्या विजयासाठी प्रयत्नशील असून, सर्व कार्यकर्त्यांनी निवडणुकीसाठी एकादीलाने काम करावे असे आव्हान पत्र परिषदेत जिल्हा काँग्रेसचे निरीक्षक तथा अखिल भारतीय काँग्रेसचे वर्किंग कमिटीचे सदस्य श्री रुद्रा राजू यांनी आव्हान केले. यावेळी या पत्रकार परिषदेस श्री रुद्रा राजू यांच्या समवेत काँग्रेसचे जेष्ठ नेते नवनाथ थोटे, युवक काँग्रेसचे सरचिटणीस राहुल टेकाळे, तालुकाध्यक्ष नारायण होके, पक्षाच्या अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे, शहराध्यक्ष अफरोज तांबोळी, कार्यलय प्रमुख शेख अहेमद, ऍड. इनामदार,महावीर मस्के,समिउद्दीन अन्सारी, शेखजाणूशहा,सह काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी**
**जि.जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी**

npghansawangi@gmail.com Ph No. ०२४८३-२७१७८७
जा.क्र.२०२४/नपघ/जा.प्र./कावी- २४८५ दिनांक:- २४/१०/२०२४

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार १. उमेर अफसर कुरेशी २. मुदस्सीर जहीर कुरेशी ३. संभाजी नामदेव दुधाळ ४. इम्तेहाज मुसा कुरेशी ५. अबु सोफियान जमील कुरेशी सर्व रा.ता.जि.बिड यांनी नामे १. शिवाजी ज्ञानोबा काकडे २. सिताराम ज्ञानोबा काकडे रा. कंडारी परतुर ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं २७६३ दि. ०९/०८/२०२४ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं ३७७९ दिनांक:- २२/१०/२०२४ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला १. शिवाजी ज्ञानोबा काकडे २. सिताराम ज्ञानोबा काकडे रा. कंडारी परतुर ता. घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट नं (५२) मधील प्लॉट नं. ०१ ते ०५ व ०८-ए आणि १२ ते २९ पर्यंत असे एकुण प्लॉट २४ सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७२ मधील एकुण क्षेत्र २९९३.१२ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

प्लॉट नं. ०१ ते ०५ पर्यंत क्षेत्र १२८१.३७ चौ.मी चतुःसिमा

पुर्व :- प्लॉट नं. ०६, पश्चिम :- वाल कंपाऊंड, दक्षिण :- ओपन स्पेस ९ मीटरचा रस्ता व प्लॉट नं. १२ चा भाग, उत्तरेस : तहसिल कार्यालयचा समोरील रोड, प्लॉट नं. १२ ते १४ पर्यंत क्षेत्र ३१९.४६ चौ.मी चतुः सिमा पुर्व :- प्लॉट नं. ०९,१० व ११, पश्चिम :- ९ मीटर रूंदीचा रस्ता, दक्षिण :- ९ मीटर रूंदीचा रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. ५ व ६, प्लॉट नं. २४ ते २९ पर्यंत क्षेत्र ५०४.२८ चौ.मी चतुःसिमा, पुर्व :- ९ मीटरचा पॉथ वेय, पश्चिम :- कंपाऊंड वाल, दक्षिण:- ९ मीटर रूंदीचा रस्ता, उत्तरेस : कंपाऊंड वाल, प्लॉट नं. ८-ए क्षेत्र १३६.४२ चौ.मी चतुः सिमा पुर्व :- वाल कंपाऊंड , पश्चिम :- ९ मीटर रूंदीचा रस्ता, दक्षिण :- प्लॉट नं. ८-बी, उत्तरेस :- काकडे कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. १५ ते २३ पर्यंत क्षेत्र ७५१.५९ चौ.मी चतुःसिमा पुर्व :- वाल कंपाऊंड , पश्चिम :- ९ मीटर रूंदीचा रस्ता, दक्षिण :- वाल कंपाऊंड, उत्तरेस ९ मीटर अंतर्गत रस्ता

या वरील चतु: सिमा मधील २९९३.१२ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात ७ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

शिक्का

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगरपंचायत घनसांवगी



**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी**
**जि.जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी**

npghansawangi@gmail.com Ph No. ०२४८३-२७१७८७
.जा.क्रं.२०२४/नपघ/जा.प्र./कावी-२४८९ दिनांक:- २४/१०/१०२४

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार शारदा राम कदम रा.ठाकर आडगांव ता. गेवराई जि.बिड यांनी नामे १. शिवाजी ज्ञानोबा काकडे २. सिताराम ज्ञानोबा काकडे रा. कंडारी परतुर ता.घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं २७६२ दि. ०९/०८/२०२४ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं ३७७८ दिनांक:- २२/१०/२०२४ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला १. शिवाजी ज्ञानोबा काकडे २. सिताराम ज्ञानोबा काकडे रा. कंडारी परतुर ता. घनसावंगी जि. जालना नावावर असलेला गट नं (५२) मधील प्लॉट नं. ०६ व ०६-ए सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं १५७२ मधील एकुण क्षेत्र ५०१.९३ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु : सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्व :- ९ मीटर कॉलनी अंतर्गत रोड, पश्चिम : -प्लॉट नं. ०५

दक्षिण : प्लॉट नं. ११ व १२ चा भाग, उत्तरेस :- तहसिल रोड

या वरील चतुःसिमा मधील ५०१.९३ चौ.मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

शिक्का


स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगरपंचायत घनसांवगी


## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) च्या कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन

### मोठ्या संख्येने उपस्थित रहावे - प्रकाश वेदपाठक

अंबाजोगाई। प्रतिनिधी

राज्यातील सत्ता परिवर्तन घडवून आणण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे राष्ट्रीय अध्यक्ष दिपकभाऊ निकाळजे यांनी पुढाकार घेतला आहे. याचाच एक भाग म्हणून केज येथे रविवार, दिनांक २७ ऑक्टोबर रोजी कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मराठवाडा संपर्कप्रमुख प्रकाश वेदपाठक यांनी केले आहे.



आमच्या प्रतिनिधीशी बोलताना प्रकाश वेदपाठक यांनी सांगितले की, राष्ट्रीय अध्यक्ष दिपकभाऊ निकाळजे यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील सत्ता परिवर्तन घडवून आणण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) कटिबद्ध आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी - पाटोदा - शिरूर, बीड, गेवराई, माजलगाव आणि केज या ५ विधानसभा मतदारसंघात आम्ही उमेदवार उभे करणार आहोत. निवडणूक लढविणार आहोत. सत्ता परिवर्तन व्हावे या दृष्टीकोनातून बीड जिल्ह्यातील केज येथे रविवार, दिनांक २७ ऑक्टोबर रोजी दुपारी ३.३० वाजता स्वामी समर्थ मंगल कार्यालय, धारूर रोड येथे भव्य कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) चे राष्ट्रीय अध्यक्ष दिपकभाऊ निकाळजे हे असणार आहेत. यावेळी प्रदेश कार्याध्यक्ष बाळासाहेब पवार, प्रदेश उपाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ, प्रदेश संघटक कैलास जोगदंड, मराठवाडा कार्याध्यक्ष भगवंत वायबसे, मराठवाडा कार्याध्यक्ष बबन जंगले, मराठवाडा संघटक संजय तेलंग, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब वाघमारे (बीड) हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. मेळाव्याच्या यशस्वितेसाठी ऋषिकेश शिंदे (युवक जिल्हाध्यक्ष), अलकाताई साळुंखे (युवती महिला जिल्हाध्यक्ष), मदिना भाभी शेख (महिला जिल्हा उपाध्यक्ष), नासेर शेख (अंबाजोगाई तालुकाध्यक्ष), प्रमोद गाढे (शहराध्यक्ष), अजय आगळे (युवक तालुकाध्यक्ष), उमाताई गायकवाड (महिला तालुकाध्यक्ष), नवनाथ घनघाव (तालुका उपाध्यक्ष), सुनिल कांबळे (शहराध्यक्ष), कमलताई चौधरी, नसरीन भाभी गवळी यांनी पुढाकार घेतला आहे.



# आमदार क्षीरसागर यांना डावलणे म्हणजे शरद पवारांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह!



## पहिल्या यादीचा मानकरी वेटींगवर कशासाठी?

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रात सत्तांतर झाल्यानंतर अजित पवारांचा स्वतंत्र गट सरकारमध्ये विलीन झाला. त्यावेळी बीडचे आमदार संदीप क्षीरसागर वगळता जिल्ह्यातील सर्वच्या सर्व आमदार अजित पवारांच्या सोबत सत्तेत सामील झाले. मात्र आ. संदीप क्षीरसागर हे शरद पवारांशी एकनिष्ठ राहून पक्षात मजबूतपणे राहिले. आणि जिल्ह्याची धुरा एकट्याने खांद्यावर सांभाळली. अगदी लोकसभेच्या निवडणुकीतही जीवाचे रान करून खा. बजरंग सोनवणे यांना निवडून आणण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. मात्र तरीही बाजार बुणग्यांच्या सांगण्यावरून आ. क्षीरसागर यांना पहिल्या यादीतून डावल्याची चर्चा होत आहे. आ. क्षीरसागर यांच्यासारखा एकनिष्ठ आमदार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी डावलला तर शरद पवार यांच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे.**

महाराष्ट्र मध्ये आघाडीचे सरकार जाऊन भाजपा- शिवसेना (शिंदे गट) यांचे सरकार अस्तित्वात आले. त्यानंतर अनेक घडामोडी घडल्या. या घडामोडीत शरद पवार यांचे पुतणे अजित दादा पवार यांनी एक स्वतंत्र गट घेऊन ते शिवसेना -भाजपा सरकारमध्ये सामील झाले. या सरकारमध्ये अनेकांना मंत्रिपदाची अपेक्षा असल्याने तेही अजित दादा सोबत गेले. बीड जिल्ह्यातीलही राष्ट्रवादी काँग्रेसचे तीन आमदार अजित दादा सोबत गेले. मात्र बीडचे आ. संदीप क्षीरसागर हे शरद पवारांशी एकनिष्ठ राहून कायम पक्षात राहिले. ज्या दिवशी हे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अजित दादा सोबत गेले त्याच दिवशी आ. संदीप क्षीरसागर यांनी आपण कायम शरद पवार यांच्या सोबत राहणार असल्याचे स्पष्ट करत ते कायम पवार साहेबांच्या सोबत राहिले. एवढेच नव्हे तर जिल्हाध्यक्ष म्हणूनही जिल्ह्याची राष्ट्रवादी काँग्रेस ठाम पवार साहेबांच्या पाठीशी उभी केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष चव्हाण हेही अजित दादासोबत गेले. त्यावेळी पूर्ण जिल्ह्याची धुरा आ. संदीप क्षीरसागर यांनी सांभाळली. याही पुढे जाऊन ज्यावेळी लोकसभेला बजरंग बप्पा सोनवणे यांना उमेदवारी जाहीर झाली. त्यावेळे पासून शेवटच्या क्षणापर्यंत आ. संदीप क्षीरसागर यांनी त्यांची समर्थपणे साथ दिली. बीड विधानसभा मतदारसंघातून जवळपास ६०००० ची लीड दिली. मात्र बजरंग सोनवणे खासदार झाल्यानंतर त्यांनीच संदीप क्षीरसागर यांच्या विरुद्ध पवारांचे कान भरायला सुरुवात केली. अनेक लायकी नसणाऱ्या लोकांना घेऊन पवार साहेबांना यांना तिकीट द्या अशी मागणी करू लागले. याशिवाय इतर अनेक लोक संदीप क्षीरसागर यांच्या विरोधात पवारांचे कान भरू लागले. मात्र पवार शरद पवारांसारखा मुरब्बी नेता या निष्ठावंत आमदाराला डावलेल अशी शक्यता दुरापास्त दिसत होती. अशा स्थितीतच संदीप क्षीरसागर यांचे नाव पहिल्या यादी येणे गरजेचे होते. मात्र तसे झाले नाही .त्यामुळे दुसऱ्या यादीत त्यांचे नाव येणे अपेक्षित आहे. त्यांना उमेदवारी डावलली तर राष्ट्रवादी पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्याच विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे .आणि याची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रभर होणार आहे .जर आ. संदीप क्षीरसागर यांची उमेदवारी डावलली गेली तर महाराष्ट्रात शरदचंद्र पवार यांच्यावर विश्वास ठेवायचा की नाही? याचा विचार राजकीय मंडळी करतील. असे झाले तर आगामी काळात शरद पवार यांच्या राजकारणाची विश्वासार्हताच राहणार नाही. आणि राजकारणात विश्वासार्हता नसेल तर महाराष्ट्रभर पवार साहेबांचे राजकारण कसे चालेल? असा प्रश्न या निमित्ताने निर्माण होणार आहे. आता परिस्थिती वेगळी असली तरी प्रत्येक वेळी परिस्थिती अनुकूल राहीलच असे नाही. प्रतिकूल परिस्थितीमध्ये ज्यांनी साथ दिली त्या निष्ठावंतांना डावलून फायद्यासाठी पक्षाचे तिकीट मागणाऱ्यांना शरद पवार तिकीट देत असतील तर शरद पवारांची विश्वासार्हता ते गमावून बसतील आणि मतदार याबाबत विचार करतील.

## माधव निर्मळ यांचा माजलगाव विधानसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल

किल्लेधारूर । प्रतिनिधी

ऑक्टोबर रोजी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या एकतेच्या विचारांच्या प्रेरणेने, ऐतिहासिक परंपरेचे पालन करत, माधव तात्या निर्मळ यांनी आज माजलगाव विधानसभा मतदारसंघातून विधानसभा निवडणुकीचा अर्ज दाखल केला. या संदर्भात त्यांनी विविध सामाजिक व ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांना श्रद्धांजली अर्पण केली.

निवडणुकीपूर्वीची त्यांची ही तयारी त्यांच्यासाठी एक महत्वपूर्ण क्षण आहे. त्यांनी त्यांच्या आदर्श मानलेल्या शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू, फुले, आणि अन्य समाज सुधारकांची मनोभावे स्मृती केली. माधव तात्या निर्मळ यांनी माजलगाव लोकांच्या कल्याणासाठी तळमळणारे विचार



व्यक्त केले.

अर्ज दाखल करण्याच्या यावेळी, त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. बेहेर, गोपीनाथ गड येथे नतमस्तक होऊन स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांच्याकडून आशीर्वाद घेतले, तसेच स्व. वसंतरावजी नाईक यांना श्रद्धांजली अर्पण केली.''जनतेच्या आशीर्वादाने आज माझा उमेदवारी अर्ज दाखल झाला आहे. मी विनंती करतो की, जनता माता माऊलींनी माझ्या कामात मला मतदान रुपी आशीर्वाद देवो, जेणेकरून मी माजलगाव विधानसभा मतदारसंघाच्या सर्वसामान्य जनतेसाठी काम करू शकेन,'' असे माधव तात्या निर्मळ यांनी म्हटले.या निवडणुकीत त्यांच्या कार्यपद्धतीवर जनतेचा विश्वास असू शकतो, हे त्यांनी त्यांच्या कार्यकाळात अनेक सामाजिक व राजकीय उपक्रमांच्या माध्यमातून सिद्ध केले आहे.

## भास्कर दानवे यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल



जालना । प्रतिनिधी

माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांचे चुलत बंधू भास्कर आबा दानवे पाटील यांनी आज अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे अपक्ष उमेदवारीचा अर्ज आज दाखल करण्यात आला.

जालना विधानसभा मतदार संघातून विधानसभा निवडणूक २०२४ साठी मा भास्कर मुकुंदराव दानवे यांनी आज गुरुपुष्यामृत दिनी गुरुवार (दि.२४) रोजी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.श्री भास्कर मुकुंदराव दानवे यांनी अर्ज दाखल करण्याआधी श्री क्षेत्र राजुर गणपतीचे

पान ३ वर

## महायुतीचे अधिकृत उमेदवार अर्जुनराव खोतकर यांचा अर्ज दाखल

जालना । प्रतिनिधी

जालना विधानसभा मतदार संघातील महायुतीचे (शिवसेना) अधिकृत उमेदवार म्हणून शिवसेना (शिंदे गट) नेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांचे नांव जाहीर होताच आणि त्यांना ए. बी. फॉर्म मिळताच श्री. खोतकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

आज गुरुवारी (दि. २४) सकाळी ११ वाजेच्या दरम्यान त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.यावेळी त्यांच्या सोबत १०१- जालना विधानसभा मतदारसंघातील युवा नेते संजय खोतकर, युवासेनेचे सचिव अभिमन्यू खोतकर. ॲड. सुनील किंगावकर, सौ. दर्शना खोतकर - झोल, सौ. समृद्धी खोतकर,



जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, यशराज खोतकर, अभोरे आदींची उपस्थिती होती.

अधिकृत उमेदवारी जाहीर झाल्यानंतर शिवसेनेचे मुख्य नेते तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून एबी फॉर्म अर्जुनराव खोतकर यांना दिला. यावेळी त्यांच्यासमवेत पुत्र अभिमन्यू खोतकर उपस्थित होते. तत्पूर्वी म्हणजे बुधवारी मुंबई येथे ए. बी फार्म आणि मुख्यमंत्र्यांचे आभार मानण्यासाठी जात असतांना अर्जुनराव खोतकर यांचा बदनापूर विधानसभा शिवसेनेच्या वतीने समृद्धी महामार्गावर अकोला निकळक शिवारात जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या नेतृत्वाखाली पान ३ वर

## जालना विधानसभा निवडणूक धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी होणार; कैलास गोरंट्याल यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**जालना । प्रतिनीधी**

**जालना विधानसभेची लढत ही धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी होणार आहे. आपण जनशक्तीचे उमेदवार असल्यामुळे शक्ती प्रदर्शन करून काय करणार असा सवाल उपस्थित करत मतदान आपल्यालाच पडणार आणि विजय आपलाच होईल असा ठाम विश्वास आ.कैलास गोरंटयाल यांनी आज येथे पत्रकारांशी बोलतांना व्यक्त केला.**

जालना विधानसभा मतदार संघातून महाविकास आघाडीच्या वतीने आ.कैलास गोरंटयाल आणि माजी नगराध्यक्षा सौ.संगीताताई गोरंटयाल यांनी आज गुरुवारी दुपारी जालन्याचे उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमंत हरकर आणि तहसिलदार तथा सहाय्यक निवडणूक अधिकारी श्रीमती छाया पवार यांच्याकडे



आपले नामनिर्देशनपत्र दाखल केले. यावेळी महेश सारस्वत, विजय चौधरी, दीपक भुरेवाल, महावीर ढक्का, सागर चिलका, विनोद यादव, राजेश पवार आदींची उपस्थिती होती. उमेदवारी दाखल केल्यानंतर उपस्थीत पत्रकारांशी बोलतांना आ. कैलास गोरंटयाल म्हणाले की, आज आपण नामनिर्देशनपत्र दाखल केले आहे. पक्षाकडून एबी फॉर्म लवकरच मिळणार असून तो प्राप्त झाल्यानंतर महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षातील नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना सोबत घेऊन आणखी

पान ३ वर

## युवकांचे जल्लोषात बाबरी मुंडे यांना पाठबळ

### बाबरी मुंडे यांचा शक्ती प्रदर्शनात उमेदवारी अर्ज दाखल

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

माजलगाव विधानसभा मतदारसंघात गुरुवारी राजकीय गरमागरमीचा दिवस ठरला. गोपीनाथ गडाच्या पायथ्याशी लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या समाधीचे दर्शन घेत हजारो युवकांसोबत शक्ती प्रदर्शन करत फुलचंद उर्फ बाबरी मुंडे यांनी गुरुवारी दुपारी गुरुपुष्यामृत मुहूर्तावर माजलगाव येथे अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला.याप्रसंगी बाबरीसेठ तूम आगे बढो हम तुम्हारे साथ हैं च्या घोषणांनी माजलगाव परिसर दवळून



निघाला होता.

गुरुवारी सकाळी पाच वाजता परळी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करत फुलचंद उर्फ बाबरी मुंडे यांनी गोपीनाथ गडावरील लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब यांच्या समाधीचे दर्शन घेतले.श्रीक्षेत्र बाभळगाव हनुमान मंदिर , माता आंबा चोंडी देवी दर्शन धारूर, श्रीक्षेत्र चारदरी हनुमान मंदिर, संत श्रेष्ठ भगवान बाबा दर्शन कोठरबन , श्रीक्षेत्र चिंचवन, मकृध्वज मंदिर दर्शन, चौंडेश्वरी मंदिर वडवणी दर्शन, राजा हरिश्चंद्र पिंपरी येथे हरिश्चंद्र मंदिर दर्शन, पात्रुड येथे हजरत ख्वाजा मगदूम अन्सारी दर्गा, शुक्लतिर्थ निमगाव येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर , खरात आडगाव येथे श्री सावता महाराज मंदिर व महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन, माजलगाव शहरातील जुना मोंढा येथे कै . वसंतराव नाईक साहेब, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन केले, श्रावस्ती पान ३ वर

## जरांगे पाटील यांचे विश्वासू किशोर पिंगळे यांचा उमेदवारी अर्ज दाखल!

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभेसाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे विश्वासू सामाजिक कार्यकर्ते किशोर पिंगळे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. महाराष्ट्राच्या विधानसभेचे रणसिंग जरी फुंकलं असलं तरी अंतिम निकाल मात्र सराटी अंतरवाली येथूनच येणार आहे. सर्व पक्षांनी आपापले उमेदवार जवळपास निश्चित केले असून त्यांच्या मनातही अद्याप धाकधूक होतच आहे जोपर्यंत जरांगे पाटलांचा आदेश येत नाही तोपर्यंत कोणत्याच उमेदवाराला आपण निवडून येणार असं वाटत नाही. त्यामुळे जरांगे पाटील यांचा आदेश आल्यानंतरच स्पष्ट होईल कुणावर पडणार गुलाल आणि कुणाला लागणार बुक्का. तोपर्यंत वेट अँड वॉच भूमिका घ्यावी लागणार



आहे.

महाराष्ट्रातील समाज बांधवांच्या वीस तारखेच्या आयोजित बैठकीमध्ये संघर्ष योद्धा म्हणून जरांगे पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे उमेदवारी अर्ज बऱ्याच इच्छुक उमेदवारांनी दाखल केले आहेत. बीड विधानसभेतून मात्र त्यांचे जवळचे आणि निकटवर्ती असलेले किशोर पिंगळे यांनी देखील उमेदवारी अर्ज दाखल केला असला तरी त्यांनी जोपर्यंत पाटलांचा आदेश येत नाही तोपर्यंत मी पुढचं कोणतंच पाऊल उचलणार नाही असं स्पष्ट केलं आहे. पण किशोर पिंगळे यांनी अर्ज दाखल करताच १८ पगड जाती धर्मातील लोकांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षात सुरू केला आहे. बीडचा आमदार कैसा हो किशोर पिंगळे जैसा हो अशा हॅशटेक देत त्यांच्या उमेदवारीबद्दल समाधान व्यक्त केला असून जरांगे पाटलांना देखील सोशल मीडियाच्या माध्यमातून विनंती केली जात आहे की बीड विधानसभेला किशोर पिंगळे यांचे नाव जाहीर करून आम्हाला आमच्या हक्काचा उमेदवार द्यावा अशी सोशल मीडियावर मागणी होत आहे.

पान ३ वर

## मोहन अग्रवाल यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**परतूर । प्रतिनिधी**

शिवसेनेचे जिल्हा प्रमुख मोहन अग्रवाल यांनी ०९९ परतूर विधानसभा मतदार संघातून अपक्ष म्हणुन उमेदवारी अर्ज दाखल केला आहे यावेळी मंठा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रल्हादराव बोराडे ,उप जिल्हाप्रमुख बाबासाहेब चिखले, परतुर शिवसेना तालुका प्रमुख अमोल सुरूंग, विधानसभा संघटक विजयकुमार गिरी, ओबीसी जिल्हाध्यक्ष शिवाजीराव तरवटे, शहर प्रमुख दीपक हिवाळे,युवा सेना तालुका अध्यक्ष अविनाश कापसे,सरपंच दिनकरराव शेंडगे ,दलित आघाडी अध्यक्ष राहुल भदर्गे, शिव लहु सेनेचे जिल्हाध्यक्ष रामप्रसाद कसाब, उप तालुका प्रमुख नितीन राठोड, उपतालुका प्रमुख शरद तळेकर, वैद्यकीय मदत कक्षाचे अध्यक्ष कैलास चव्हाण, बंजारा नेते राम राठोड, गोविंद खरात ,उप तालुकाप्रमुख व्यंकटेश लीपणे ,उप तालुका प्रमुख सोपान कातारे,युवा सेना उपतालुकाप्रमुख पान ३ वर

## पाच विधानसभा मतदार संघासाठी २० उमेदवारांचे २६ अर्ज दाखल

### आजपर्यंत ३१२ उमेदवारांना ७५० नामनिर्देशन अर्जाचे वितरण

जालना । प्रतिनिधी

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील परतूर, घनसावंगी, जालना, बदनापूर (अ.जा.) आणि भोकरदन या पाच विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी आज २० उमेदवारांनी २६ नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे आजपर्यंत एकुण २५ उमेदवारांचे ३२ नामनिर्देशन अर्ज स्विकारण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे.

९९-परतूर विधानसभा मतदार संघासाठी ४ उमेदवारांनी ४ नामनिर्देशन अर्ज दाखल केले यात आसाराम जिजाभाऊ बोराडे



(शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे), सुरेशकुमार कन्हैलाल जेथलिया (इंडियन नॅशनल काँग्रेस) यांचा समावेश आहे. घनसावंगी मतदारसंघासाठी ३ उमेदवारांनी ४ नामनिर्देशन अर्ज दाखल केले यात राजेश अंकुशराव टोपे (नॅशनालिस्ट काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार), मनिषाताई राजेशभैय्या टोपे (नॅशनालिस्ट काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार) यांचा समावेश आहे. जालना विधानसभा मतदार संघासाठी ४ उमेदवारांनी ५ नामनिर्देशन अर्ज दाखल केले यात अर्जुनराव पंडितराव खोतकर (शिवसेना), कैलास किसनराव गोरंट्याल (इंडियन नॅशनल काँग्रेस), संगीता कैलास गोरंट्याल (इंडियन नॅशनल काँग्रेस) यांचा समावेश आहे. बदनापूर विधानसभा मतदारसंघासाठी ७ उमेदवारांनी ८ नामनिर्देशन अर्ज दाखल केले यात चौधरी रुपकुमार नेहरुलाल (नॅशनालिस्ट काँग्रेस पार्टी), कुचे नारायण तिलकचंद (भारतीय जनता पार्टी) यांचा समावेश आहे. भोकरदन या तीन विधानसभा मतदार पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बारामतीचा भ्रष्टाचार संपवणार !

## अजित पवारांविरुद्ध उमेदवारी जाहीर होताच युगेंद्र पवारांचा पहिला

**बारामती । प्रतिनिधी**

उमेदवारी जाहीर झाल्यानंतर युगेंद्र पवार यांनी संवाद साधला, खरंतर पवारसाहेब व राष्ट्रवादी पक्षाने माझ्यावर जो विश्वास दाखवला, त्याबद्दल मी सर्वांचे आभार व्यक्त करतो आणि विनम्रपणे हा निर्णय स्वीकार करतो. मला दिलेल्या संधीचं सोनं करीन, पवारसाहेबांना माझा अभिमान वाटेल असं काम मी करेन, असे युगेंद्र पवार यांनी म्हटलंय. मुद्दे अनेक आहेत, बारामतीमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे, २५ गावांत प्यायला पाणी नाही. बेरोजगारीचा मुद्दा आहे, शेतकऱ्यांच्या पिकाला भाव नाही. शिक्षणात आपण जोर दिला पाहिजे. तसेच, भ्रष्टाचार, गुन्हेगारी आणि महिलांवरील अत्याचारा प्रश्न मोठा आहे. बारामतीमध्ये वाढलेला भ्रष्टाचार, स्थानिक पातळीवरील हा भ्रष्टाचार वाढलाय तो संपवायचा आहे, असे म्हणत युगेंद्र पवारांनी नाव न घेता



अजित पवारांवर तोफ डागली. महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार पक्षाची पहिली ४५ उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये, शिवसेना ठाकरे गटाप्रमाणेच शरद पवारांनीही राष्ट्रवादीच्या अजित पवारांना तगडं आव्हान दिलंय. सर्वाचं लक्ष लागलेल्या बारामती विधानसभा मतदारसंघात थेट अजित पवार विरुद्ध युगेंद्र पवार (धींसशपवीर रिुरी) म्हणजेच काका विरुद्ध पुतण्या अशी लढत होणार आहे. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर पहिली प्रतिक्रिया देत युगेंद्र पवार यांनी अजित पवारांना लक्ष्य केलंय. दुसरीकडे विदर्भात मंत्री धर्मराव आत्राम यांच्याविरुद्ध त्यांच्या लेकीलाच शरद पवारांनी मैदानात उतरवलं आहे. अहेरी मतदारसंघातून भाग्यश्री आत्राम यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यामुळे, महायुती विरुद्ध महाविकास आघाडीच्या लढाईत घड्याळाला तुतारीचं मोठं आव्हान निर्माण झालंय. त्यातच, युगेंद्र पवार यांनी अजित पवारांवर तोफ डागली आहे. त्यामुळे, बारामतीमधील (इरीरारींळ) लढत रंगतदार आणि राजकीयदृष्ट्या अत्यंत लक्षवेधी होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारांच्या पक्षाची पहिली उमेदवारी यादी बुधवारी जाहीर झाली, त्यामध्ये अजित पवारांना बारामतीमधून उमेदवारी देण्यात आली आहे. तर दुसरीकडे शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून युगेंद्र पवारांना विधानसभेच्या मैदानात उतरवण्यात आलं आहे. लोकसभा निवडणुकांपासूनच युगेंद्र पवार विरुद्ध अजित पवार अशी बारामतीत लढत होईल, अशी चर्चा होती. त्यानुसार आता ही लढत निश्चित झाली असून पवार विरुद्ध पवार असा सामना होत आहे. दरम्यान, राज्यातील विधानसभा निवडणुकांसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे.

# पाण्याच्या टाकीखाली दबून ३ कामगारांचा मृत्यू, पिंपरी चिंचवडमधील घटना



**पिंपरी। प्रतिनिधी**

पिंपरी चिंचडवमध्ये एक मोठी दुर्घटना घडली आहे. त्यात ३ कामगारांना आपला जीव गमवाला लागला आहे. पिंपरी चिंचवड शहरातील भोसरी सद्गुरू नगर परिसरात ही दुर्दैवी घटना घडली. ज्या पाण्याच्या टाकीखाली हे तीन कामगार चिरडले गेले ती नुकतीच बांधली गेली होती. त्याचे बांधकाम कच्चे असल्यामुळे ती कोसळली. या भागात कामगारांची वस्ती आहे.तिथेच हे मृत झालेले कामगार राहात होते.

भोसरी सद्गुरू नगर परिसरात एक लेबर कॅम्प आहे. तिथे पाण्याची मोठी टाकी उभारण्यात आला आहे. ज्या लेबर कॅम्प परिसरात ही घटना घडलीय त्या ठिकाणी १ हजारहून अधिक कामगार वास्तव्यास आहेत. जिथे उभारण्यात आलेल्या पाण्याच्या टाकी खाली हे कामगार काम करत होते. त्या टाकीचे काम हे पूर्ण होऊन काही दिवस देखील झाले नव्हते. बांधकाम कच्चे असल्यामुळे ही टाकी कोसळली असा अंदाज आहे. ज्या वेळी ही टाकी कोसळली त्यावेळी त्या खाली कामगार हे काम करत होते. दरम्यान ही जागा रेड झोनमध्ये येत असल्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासन आणि पिंपरी चिंचवड पोलीस याबाबत चौकशी करत आहेत. जर कोणी यामध्ये दोषी आढळल्यास त्यावरती कारवाई केली जाईल असं पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# भोसलेवाडीतील जवानाचा गुजरातमध्ये अपघाती मृत्यू

पुरंदर

भारतीय लष्करात हरियाणातील अंबाला या ठिकाणी नायक पदावर कार्यरत असणारे भोसलेवाडी (ता. पुरंदर) येथील जवान अविनाश हरिश्चंद्र भोसले (वय ३२) यांचा धावत्या रेल्वेतून पडून मृत्यू झाला. बुधवारी (दि. २३) त्यांच्यावर मूळगावी भोसलेवाडी येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.




अविनाश भोसले हे सैन्यदलातील कामानिमित्त पुणे येथे आले होते. पुण्यातील काम आटोपून गावी कुटुंबीयांना भेटून पुन्हा हरियाणा येथे निघाले होते. अंबाला येथे जात असताना गुजरातमधील वापी येथे धावत्या रेल्वेतून पडून त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे भोसलेवाडीसह तालुक्यात शोककळा पसरली आहे. शेतकरी कुटुंबात जन्मलेले अविनाश हे एकुलते एक होते. त्यांना लहानपणापासूनच लष्करात भरती होण्याची इच्छा होती. २०११-१२साली ते लष्करात दाखल झाले होते. त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे कुटुंबात आणि पंचक्रोशीत ते लाडके होते. गावातील सामाजिक कामात ते अग्रेसर होते. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, ४ वर्षांची मुलगी आणि एक बहीण असा परिवार आहे. अंत्यसंस्कारावेळी हरियाणा येथील लष्करातील अधिकारी आणि जेजुरी पोलिसांच्या वतीने त्यांना मानवंदना देण्यात आली. या वेळी आमदर संजय जगताप, माजी मंत्री विजय शिवतारे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे, जेजुरी पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक दीपक वाकचौरे यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाबा सिद्दिकी खूनप्रकरणी आणखी तिघे ताब्यात

पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या खून प्रकरणात मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने पुण्यातून आणखी तिघांना बुधवारी रात्री ताब्यात घेतले. पुणे शहर पोलिस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्याकडून त्याला दुजोरा मिळाला. रूपेश राजेंद्र मोहोळ (वय २२, रा. शिवणे), करण राहुल साळवे (वय १९, रा. उत्तमनगर) आणि शिवम अरविंद कोहाड (वय २०, रा. उत्तमनगर) अशी संशयित आरोपींची नावे आहेत.माजी राज्यमंत्री बाबा सिद्दीकी यांची नुकतीच मुंबईत गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात मुंबई पोलिसांनी वारजे परिसरातून प्रवीण लोणकर याला अटक केली होती. त्यानंतर मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने पुण्यातून आणखी तिघांना अटक केली आहे.

# हर्षवर्धन पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल!

इंदापूर । प्रतिनिधी

माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी इंदापूर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून महाविकास आघाडीचे उमेदवार उमेदवार म्हणून गुरुपुष्पामृतच्या मुहूर्तावर भव्य रॅली काढून गुरुवारी (दि. २४) अर्ज दाखल केला.



उमेदवारी अर्ज दाखल करणेपूर्वी भाग्यश्री निवासस्थानी हर्षवर्धन पाटील यांचे खासदार सुप्रिया सुळे, भाग्यश्री पाटील, अंकिता पाटील ठाकरे यांनी औक्षण केले. यावेळी पृथ्वीराज जाचक, मुरलीधर निंबाळकर, राहुल मखरे, तेजसिंह पाटील, अँड कृष्णाजी यादव, विलासराव वाघमोडे, भारतीताई शेवाळे, अशोक घोगरे, सागरबाबा मिसाळ, नितीन शिंदे, काका देवकर, प्रा. कृष्णाजी ताटे, अनिल पवार, संजय शिंदे, बाबासाहेब भोंग, तुषार खराडे यांनी मनोगत व्यक्त केले.

या सभेमध्ये इंदापूर शहरातील अनिल पवार यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह तसेच बावडा ग्रा. पं. सदस्य पांडुरंग कांबळे, सुनील साबळे, विनोदकुमार जाधव यांनी असंख्य सहकार्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षामध्ये प्रवेश केला. यावेळी निरा भिमा कारखान्याचे अध्यक्ष लालासाहेब पवार, अंकिता पाटील ठाकरे, महारुद्र पाटील, राजवर्धन पाटील, महिला तालुकाध्यक्षा छायाताई पडसळकर, कार्याध्यक्षा आश्मा मुलाणी, मयूरसिंह पाटील, अमोल भिसे, सुखदेव घोलप, आशुतोष भोसले, उदयसिंह पाटील, हेमंत नरुटे, उमेश घोगरे, चांगदेव घोगरे, शहराध्यक्ष इनायत काझी, महिलाध्यक्षा रेश्मा शेख, बाळासाहेब पाटील, नंदकुमार सोनवणे, प्रदीप पाटील, मोहन दुधाळ, पांडुरंग शिंदे, शिवाजी हांगे, बापू कोकाटे आदींसह शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ), काँग्रेसचे व विविध संस्थांचे पदाधिकारी, संचालक, कार्यकर्ते, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सूत्रसंचालन कैलास कदम व राजेंद्र पवार यांनी तर आभार अँड. शरद जामदार यांनी मानले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षातून सहा जणांनी उमेदवारी मागितली होती. लोकशाहीमध्ये उमेदवारीची इच्छा व्यक्त करणे योग्यच आहे. मीही पक्षाकडे उमेदवार मागणीचा अर्ज केला. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी राज्याचा सारासार विचार करून माझ्या उमेदवारीचा निर्णय घेतला.

# पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांना मिळणार 'अपार आयडी'

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्र शासनाकडून देशातील प्रत्येक विद्यार्थ्याला अपार आयडी उपलब्ध करून देण्याचा राष्ट्रीय उपक्रम सुरू केला आहे. त्यानुसार राज्यातील पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांना अपार आयडी देण्यात येणार आहे. त्यामध्ये प्रथम प्राधान्याने यू-डायस प्रणालीमधून नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना अपार आयडी उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यासाठी येत्या २० नोव्हेंबरपर्यंतची डेडलाइन देण्यात आली असल्याची माहिती महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या राज्य प्रकल्प संचालक आर. विमला यांनी दिले आहेत.

आर. विमला यांनी दिलेल्या निर्देशानुसार, केंद्र शासनाकडून राज्यातील सर्व प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे अपार आयडी तयार करण्यासाठी कळविण्यात आले असून, यू-डायस सॉफ्टवेअरमध्ये सुविधा उपलब्ध करून दिली आहे. अपार आयडी उपलब्ध करून देण्यासाठी मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. त्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे सर्व विद्यार्थ्यांचे अपार आयडी तयार करण्याची कार्यवाही पूर्ण करून घेण्यात यावी. अपार आयडी तयार करण्याच्या अनुषंगाने केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचना व या कार्यालयाकडून




मार्गदर्शक सूचना व प्रशिक्षण जिल्ह्याचे सर्व संगणक प्रोग्रामर व तालुक्याचे एमआयएस समन्वयक यांना देण्यात आल्या असून, शाळेच्या मुख्याध्यापकांना प्रशिक्षण देण्यासाठी कळविले आहे.

अपार आयडी तयार करण्याच्या अनुषंगाने शिक्षक-पालक बैठक शाळास्तरावर आयोजित करून पालकांकडून ना हरकत प्रमाणपत्र भरून घेण्यात यावे. अपार आयडी तयार करण्याच्या अनुषंगाने सर्व शाळेच्या मुख्याध्यापकांना प्रशिक्षण गट स्तरावरून प्रशिक्षण देण्यात यावे व दररोज आढावा घेण्यात यावा. अपार आयडी तयार करण्याचा राज्य स्तरावरून दररोज आढावा घेण्यात येईल. तसेच, विद्या समिक्षा केंद्रामार्फत त्याचा आढावा घेण्यात येईल. याचप्रमाणे, जिल्हा व तालुका स्तरावरून अपार आयडी तयार करण्याबाबत दररोज आढावा घेण्यात यावा आणि हा अहवाल विभागीय उपसंचालक, शिक्षण संचालक, आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कार्यालयास पाठविण्यात यावा.

अपार आयडी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्यानंतर सर्व शाळेच्या मुख्याध्यापकांनी हा आयडी विद्यार्थ्यांच्या ओळखपत्रावर प्रिंट करून घ्यावा. शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे प्रत्येक आठवड्याला आढावा घेऊन ज्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना अपार आयडी तयार करून दिले नाहीत. त्यांचा अहवाल आयुक्त कार्यालयास आणि महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या कार्यालयास पाठविण्यात यावा, असेदेखील स्पष्ट करण्यात आले आहे.

# आंतरविभागीय हॉकी (मुले) स्पर्धा संपन्न





**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती अंतर्गत रयत शिक्षण संस्थेचे, महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी, पुणे-१७ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरविभागीय मुले हॉकी स्पर्धांचे आयोजन १५ आणि १६ ऑक्टोबर २०२४ रोजी मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम, पिंपरी या ठिकाणी करण्यात आले. या स्पर्धांमध्ये चार विभागातील विविध संघाच्या माध्यमातून ७२ मुलांनी सहभाग नोंदवला. या स्पर्धांचा उद्घाटन सोहळा बुधवार दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी दुपारी २:३० वा. वाजता मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम, पिंपरी या ठिकाणी पार पडला. या कार्यक्रमासाठी एम. यु. वाणिज्य महाविद्यालय, पिंपरीचे शारिरीक शिक्षण संचालक प्रा. शाकुर सय्यद हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. दुसऱ्या दिवशी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, प्रो. ( डॉ.) सुरेश गोसावी हे खेळाडूंना शुभेच्छा देण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्याचबरोबर डॉ. दीपक माने, माजी क्रीडा संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ; डॉ. विष्णू पेठकर, प्रभारी क्रीडा संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ; डॉ. रमेश गायकवाड, सिनेट सदस्य श्री किशोर घडियार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा विभाग, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रोफेसर (डॉ.) पांडुरंग भोसले सरांनी प्रमुख पाहुणे यांचे स्वागत करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत शारीरिक शिक्षण संचालक डॉ. पांडुरंग लोहोटे यांनी केले.

प्रो. डॉ. सुरेश गोसावी सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना 'सिलेक्शन आणि एलिमिनेशन या मर्यादेतच खेळ खेळला जात नाही, तर खेळामध्ये सहभाग नोंदवणे हे महत्त्वाचे आहे असे सांगून सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. त्याच बरोबर या स्पर्धेचे प्रमुख पाहुणे प्रा. शाकुर सय्यद सरांनी खेळाडूंना खेळाबरोबरच अभ्यासही महत्त्वाचा आहे याचे महत्त्व पटवून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण संचालक , डॉ. पांडुरंग लोहोटे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर (डॉ.) पांडुरंग भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या परिश्रमाने या स्पर्धा यशस्वीपणे संपन्न झाल्या.

# हक्काची देणी मागणे गुन्हा आहे काय? असेल तर कूल यांनी आमच्यावर कारवाई करावीच-कामगारांची हताश मागणी

**दौंड । प्रतिनिधी**

आम्ही भिमाचे सेवानिवृत्त कामगार असुन गेली आठ वर्षे आम्ही आमची देणी द्यावित.यासाठी भिमाचे अध्यक्ष आणि तालुक्याचे आमदार राहुल कुल यांचेकडे विनवण्या करत आलो आहोत.

देणी मागणें हा गुन्हा आहे काय ? असा हताश सवाल उपस्थीत करुन गुन्हा असेल तर कुल यांनी आमचेवर कारवाई करुन आम्हा सेवानिवृत्त कामगारांना कायमचे तुरुंगात टाकावे.. अशी अतिशय विमनस्क अवस्थेत कामगारांनी प्रातिनिधिक स्वरूपात पत्रकार यांचेशी बोलताना मागणी केली आहे.सेवानिवृत्त कामगार आज आठ वर्ष कुटुंबाला एकही रुपयांचा



अर्थीक उत्पन्न बंद झाल्याने प्रपंच चालवणे अवघड झाले आहे. एक एक दिवस काढणे कठीण जात आहे. कोणी कोणाला मदत करणेही दुरापास्त झाले आहे.

तरीही देणी मिळतील अशी आशा बाळगून दिवस मोजत आहोत. आज विस दिवस झालेत उपोषण सुरु करुन कुल दखल घेण्याची जाणिव पुर्वक टाळण्याचा प्रयत्न करीत आहेत.


महसुल , पोलिस, कामगार आयुक्तालय, जिल्हाधिकारी, प्रांत आणि तहसिलदार जिल्हा समाचार पत्र, यांनी मानवतेच्या दृष्टीकोनातून आमच्याकडे लक्ष देण्याचं जाणीव पुर्वक टाळलेले आहे. आमच्यावर होत असलेला अमानुष अन्यायाची दाद घेण्यास कोणीही तयार नाही.

यापेक्षा अध्यक्ष आमदार राहुल कुल यांचे शासना सह सर्वच यंत्रणेत प्रचंड वजन आहे. त्यांनी आपले राजकीय वजन वापरून आम्हा सेवानिवृत्त कामगार यांचे विरोधात अनाजी पंत निती वापरुन साम, दाम, दंड, भेद आणि षड्यंत्र वापरुन आम्हास आणी आमच्या बायका मुलांन सह कायम स्वरुपी तुरुंगात टाकावे. देणी देता येत नाहीत. मात्र हे त्यांना सहज सत्तेच्या जोरावर करता येईल. आणि ते करून आपली जबाबदारी बेताल, तिताल आणि बेमुरवतखोर पणे एकदाची पार पाडावी.

विशेष ---- शासन व्यवस्थेत असल्याने सत्तेच्या माध्यमातून पैसा आणि पैशाच्या जोरावर पुन्हा सत्ता, भिमाचया भ्रष्टाचारामुळे मिळालेले कोट्यावधी रुपये यामुळे मस्त वाल झाल्याने कुल यांना जनतेचे घेणे देणे राहीलेले नाही. कामगारांना तर ते कवडीची किंमत देत नाहीत. त्यांच्या या वागण्याची तालुक्यात सर्व दुर प्रचंड दबाव दहशत आणि भययुक्त दादागिरी आहे. यामुळे याबाबत कोणीही बोलण्याच टाळत आहेत. यामुळे कुल प्रचंड अडचणीत आले आहेत, त्यांचे विरोधात नाराजी पसरली असुन असंतोषाचे खदखदत आहे. आणि यांचं कारणाने कुल यांचा सुपडा साफ होईल. असे उद्वेगाने सेवानिवृत्त कामगार प्रातिनिधिक स्वरूपात मत व्यक्त करीत आहेत.

# रिंगरोड हद्दीतील बांधकाम परवाना; 'एमएसआरडीसी'कडे अधिकार

पुणे - महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) १३७ कि.मी लांबीचा पुणे रिंगरोड हा प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्प डिझाइन बिल्ड फायनान्स ऑपरेट-ट्रान्सफर या तत्वावर उभारला जाणार आहे.




ऐन विधानसभेची आचारसंहिता लागू होण्याआगोदर राज्य शासनाने या रिंगरोड लगतच्या सुमारे पाच तालुक्यातील ११७ गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून एमएसआरडीसीची नियुक्ती केली आहे. त्यामुळे या गावांमधील बांधकाम परवानगीचे अधिकार हे एमएसआरडीसीकडे राहणार आहेत. रिंगरोडसाठी आवश्यक असलेल्या जागेचे संपादन एमएसआरडीसीकडून करण्यात येत आहे. या रिंगरोडलगत दोन विकास केंद्रे प्रस्तावित करण्यात आली असून ही दोन्ही विकास केंद्रे एमएसआरडीसीकडून विकसित करण्याचा इरादा शासनाने जाहीर केला आहे. या ११७ गावांमधील सुमारे ६६८ चौ.कि.मी. इतक्या क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून एमएसआरडीसी काम पाहणार आहे. रिंगरोड प्रकल्पाच्या विकासाशी संबंधित खर्चाची भरपाई विचारात घेता लँड मॉनिटायझेशन करण्यासाठी विविध लँड पुलिंग मॉडेल्सचा वापर करून या प्रदेशातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यटन सुलभ करण्यासाठी संबधित जमिनींसाठी एमएसआरडीसीला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून शासनाने नियुक्त केले आहे. याबाबतची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.